# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## १२ मार्च २००८

मा. यशवंतराव चव्हाण यांना ९५व्या
जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन



# वार्तापत्र

# क्षणचित्रे




यशवंतराव चव्हाण विज्ञान - तंत्रज्ञान राज्यस्तरीय पारीतोषिक २००७ मा. डॉ. अनिल काकोडकर यांना प्रदान करताना मा. श्री. शरदचंद्र पवार, मा. अरुण गुजराथी, मा. शरद काळे

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या २३व्या पुण्यतिथी दिनी मा. यशवंतराव चव्हाण यांच्यावरील माहीतीच्या ई-बुक प्रकाशन करताना मा. डॉ. रविंद्र बापट, मा. हुसेन दलवाई, मा. चंद्रचूड साहेब, मा. शरदचंद्र पवारसाहेब, मा. डॉ. अनिल काकोडकर, मा. अरुण गुजराथी, मा. शरद काळे इ.






पुणे विभागीय केंद्राने आयोजित 'ग्रामीण पर्यटन कार्यशाळेत' सहभागी डावीकडून - प्रसाद मिरासदार, संजय यादवराव, पांडुरंग तावारे, मा. पद्मविभूषण धारिया, श्री. शंकर मि. भिडे, मा. सुधाकरराव जोशी - माजी आयुक्त, मा. भागवतराव पवार - माजी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, मा. माधवराव गोगटे - पुणे विभाग

१२ डिसेंबर २००७ मा. ना. शरद पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त रांगोळीतून आकारलेल्या त्यांच्या भावमुद्रा.



# क्षणचित्रे



अपंगासाठी फळबाग प्रशिक्षण व अर्थसहाय्य कार्यशाळा - औरंगाबाद व्यासपीठावरील प्रमुख मान्यवर मा. सुप्रियाताई सुळे, मा. ना. राजेशभैय्या टोपे, मा. बापूसाहेब काळदाते, मा. कैलाश कमोद, मा. दत्ता बाळसराफ, मा. वसंत संख्ये इ.



यशवंतराव चव्हाण यांची २३वी पुण्यतिथीनिमित्त दि. २५-११-२००७ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान वि. केंद्र लातूर चे अध्यक्ष डॉ. जे. एम. वाघमारे यांचे व्याख्याने आयोजित केले होते. (लातूर)



यशवंतरावच्या २३व्या स्मृती दिनानिमित्त दि. २५-११-२००७ रोजी 'यशवंतराव चव्हाण यांचा वाङःमयीन दृष्टीकोन' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आपले विचार मांडताना.



विभागीय केंद्र नाशिकतर्फे दि. २५ नोव्हेंबर २००७ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या २३व्या पुण्यतिथीनिमित्त 'माझे लेखन प्रवासातील अनुभव' या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी व्यासपीठावर डावीकडून विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर, गुरमितसिंग बग्गा, सचिव ॲड. विलास लोणारी, मा. कविता महाजन, अध्यक्ष वनाधिपती विनायकदादा पाटील, आ. शोभा बच्छाव व अश्विनी बोरस्ते.

# क्षणचित्रे



यशवंतराव चव्हाण यांच्या २३व्या पुण्यतिथीनिमित्त 'माझे लेखन प्रवासातील अनुभव' या विषयावर जाहीर व्याख्यान देतांना कविता महाजन व उपस्थित श्रोते



विभागीय केंद्र कोकणच्यावतीने आयोजित केलेल्या 'कला महोत्सवाचे' उद्‌घाटन करताना मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, मा. आ. उदय सावंत, मा. श्री. राजाभाऊ लिमये, सुप्रसिद्ध गायिका मालिनी राजपूरकर इ.



विभागीय केंद्र कोकणच्यावतीने आयोजित महोत्सवात मा. यशवंतराव चव्हाण यांची पाण्यावरील काढलेली रांगोळी पाहताना रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. हसन मुश्रीफ व इतर मान्यवर



'अष्टविनायक मोटर सायकल मोहीमे''त नवमहाराष्ट्र युवा अभियान व पिर्नकल क्लबचे सहभागी झालेले कार्यकर्ते.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम. एम. एच./बी. ओ. एम. -५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.


## • विश्वस्त मंडळ सदस्य •

१. मा. श्री. शरदराव पवार — अध्यक्ष
२. मा. श्री. हुसेन दलवाई — उपाध्यक्ष
३. मा. श्री. अरुण गुजराथी — कार्याध्यक्ष
४. मा. श्री. श. गं. काळे — सरचिटणीस
५. मा. डॉ. रवींद्र बापट — कोषाध्यक्ष
६. मा. श्री. मोहन धारिया
७. मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर
८. मा. श्री. दिलीप वळसे-पाटील
९. मा. प्रा. पी. बी. पाटील
१०. मा. श्री. राम प्रधान
११. मा. श्री. गुलाम गौस
१२. मा. श्री. लक्ष्मण माने
१३. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
१४. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे
१५. मा. सौ. सुप्रिया सुळे

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. उमेशचंद्र सरंगी
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
१७. ——

## • कार्यकारिणी मंडळ सदस्य •

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरुण गुजराथी
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. बापूसाहेब काळदाते
१०. मा. श्री. रा. सु. गवई
११. मा. श्री. एन. के. पी. साळवे
१२. मा. श्री. के. बी. आवाडे
१३. मा. श्री. श्रीनिवास पाटील
१४. मा. श्री. गिरीश गांधी
१५. मा. सौ. सुप्रिया सुळे
१६. मा. श्री. शिवाजीराव गि.पाटील
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., शिरोळ
१९. मा. श्री. शामराव पा. पाटील
मा. अध्यक्ष, सह्याद्री सहकारी
साखर कारखाना, कराड (पदसिद्ध)
२०. मा. श्री. यशवंतराव गडाख
२१. मा. श्री. माणिकराव पाटील
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. उमेशचंद्र सरंगी
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

## कार्यकारी समिती

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरुण गुजराथी
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. श्रीनिवास पाटील
७. मा. सौ. सुप्रिया सुळे

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. राम प्रधान |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | डॉ. राम ताकवले |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. भाऊसाहेब नेवाळकर |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | डॉ. जनार्दन वाघमारे |
| मुख्य कार्यालय | आर्थिक सल्लागार | श्री. प्रभाकर जोशी |
| सृजन | संकल्पना व संयोजिका | श्रीमती सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. बी. डी. पवार |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथालय सल्लागार | श्री. वा. रा. कामत |
| | ग्रंथपाल | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर - श्री. सुशील गुप्तन |
| | मुख्य विपणन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |
| प्रथम - प्राथमिक शिक्षण उपक्रम | कार्यकारी सचिव | श्रीमती फरीदा लांबे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परिक्षक | | मे. सी. व्ही. के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशोब तपासनीस | | मे. टेंबे आणि म्हात्रे, चार्टर्ड अकाउन्टंट |

**Website :** ybchavan pratishthan.org • **E-mail :** ybchavan@bom3.vsnl.net.in

# विचारधन



भारतीय लोकशाही बलशाही करावयाची, तर तिच्या राष्ट्रवादाचा पाया जसा भक्कम केला पाहिजे, तसा राजकीय जीवनातील धर्मनिरपेक्षतेचा पायाही खंबीर केला पाहिजे. एका दृष्टीने आमची परंपरा ही धर्मनिरपेक्ष राज्याची परंपराच आहे. सम्राट अशोक, अकबर आणि छत्रपती शिवाजी हे आमच्या भारतीय परंपरेचे तीन उत्तम प्रतिनिधी मानले, तर त्यांनी त्यांच्याकाळात राज्यसंस्था व धर्म यांची कधीही गल्लत होऊ दिलेली आढळत नाही. मात्र व्यक्तिगत जीवनात धर्मकारण आणि धर्मकल्पना यांना श्रेष्ठ स्थान देणारे असे हे तीन थोर पुरुष होऊन गेले. अगदी अलीकडच्या काळातही हीच परंपरा महात्मा गांधीनीही चालवली.

- यशवंतराव चव्हाण

## अनुक्रमणिका

माहिती - तंत्रज्ञान प्रबोधिनी सन्मान प्रमाणपत्र ........ ४
संपादकीय ........ ५
मंगल कलश - स्व. यशवंतराव चव्हाण ........ ७
मा. डॉ. राजेंद्र पचौरी आणि डॉ. सरोज पचौरी ........ १५
नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि अपंग हक्क विकास मंच ........ २३
महाराष्ट्र महिला व्यासपीठ - कार्यवृत्त ........ २९
कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम - कार्यवृत्त ........ ३१
यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय - कार्यवृत्त ........ ३४
सृजन - कार्यवृत्त ........ ३५
विभागीय केंद्र कोकण - कार्यवृत्त ........ ३६
विभागीय केंद्र नागपूर - कार्यवृत्त ........ ३८
विभागीय केंद्र औरंगाबाद - कार्यवृत्त ........ ४२
कृषी सहकार व्यासपीठ व पुणे विभागीय केंद्र - कार्यवृत्त ........ ४३
विभागीय केंद्र कराड - कार्यवृत्त ........ ४५
विभागीय केंद्र. नासिक - कार्यवृत्त ........ ४९
विभागीय केंद्र. लातूर - कार्यवृत्त ........ ५१
माहिती तंत्रज्ञान - प्रबोधनी ........ ५३
राष्ट्रीय पुरस्कार - मान्यवरांची नावे ........ ५५
सी - डॅक ........ ५९
प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने ........ ६०

वर्ष : अकरावे

अंक : एकवीसावा

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे**
वार्तापत्र

खाजगी विनामूल्य वितरणासाठी

- **प्रकाशन**
  १२ मार्च २००८
  मा. यशवंतराव चव्हाण यांची ९५वी जयंती

- **सल्लागार**
  मा. शरद काळे
  मा. रवींद्र बापट
  मा. ज्ञानेश्वर सैरे


- **मानद संपादक**
  दत्ता बाळसराफ

- **आभार**
  प्रतिष्ठानचे सर्व अधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

- **अक्षरजुळवणी आणि छपाई**
  सानप प्रिन्टींग प्रेस, मुंबई - २.

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-संपादक **श्री दत्ता बाळसराफ** यांनी **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, सानप प्रिन्टींग प्रेस** ३६२, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, ठाकुरद्वार पोष्टाशेजारी, मुंबई - ४०० ००२ दूरध्वनी क्र. : २२०१ ०६२२ येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१, येथून प्रकाशित केले.

नोंदणी क्र. ७१५८७/९९




The 28th Convocation Ceremony of C-Dac was held on 27th January 2007 at Pune. Yashwantrao Chavan Pratishthan's Academy of Information Technology was awarded for consistent Best Performance amongst all C-Dac training Centres in the Country in all Institute were awarded in the Ceremony.

*Congratulations !*

# संपादकीय

महाराष्ट्राचे व देशाचे धुरंधर नेते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९५ व्या जयंतीदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस अंतःकरणपूर्वक अभिवादन ! त्यांनी घडविलेला व आपल्या हाती सोपविलेला महाराष्ट्र विविध क्षेत्रांतील भौतिक प्रगतिबाबत आजही अग्रेसर असल्याचे दिसून येते. सामाजिक न्यायाच्या व परिवर्तनाच्या संबंधात काही प्रश्न सध्याच्या परिस्थितीत उद्‌भवत असले तरी फुले-शाहू-आंबेडकर-साने गुरुजी यांनी घालून दिलेला पाया आजही भक्कम असल्याचेच अनेक प्रसंगात प्रत्ययाला येत आहे.

महाराष्ट्र स्वतःचे प्रश्न सोडविताना राष्ट्रीय हित कधीही नजरेआड करणार नाही. याची प्रचीती देखील वर्तमानात देत असताना इतिहासाचा दाखलाही त्याच्याशी सुसंगत असल्याचेच अभिमानपूर्वक सांगता येईल. मा. यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तीमत्व या विचार आणि भावनेचे अस्सल व मूर्तिमंत प्रतिक होते व आहे. यादृष्टीने संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या समरप्रसंगात त्यांनी निभावलेली सम्यक भूमिका आजही सर्वांनाच मार्गदर्शक ठरणारी आहे. अर्थात त्याचे आकलन प्रत्येकाला होईलच असे नाही. अनेकदा अनाठायी आवेश आणि अभिनिवेश याचा गोष्टी समजून घ्यायला अडथळा निर्माण होतो. परिणामी काही जाणकार मंडळीदेखील वावदूक विधाने करुन बसतात. मा. यशवंतरावांच्याच शांत व संयमी वृत्तीने वागणे अश्या प्रसंगी योग्य ठरते. असो, मात्र ज्याला खरोखरीच संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातील त्यांची घालमेल जाणून घ्यायची असेल त्यांच्यासाठी मा. राम प्रधान यांनी संपादित केलेल्या 'शब्दाचे सामर्थ्य' या ग्रंथातील लेख पुर्नमुद्रित केला आहे. खुद्द यशवंतरावांच्या शब्दांतच त्यावेळच्या परिस्थितीचे केलेले वर्णन उद्‌बोधक ठरावे.

हा जयंतीदिनाचा अंक आपल्या हाती देत असतानाच देशातील विविध समस्यांनी ग्रस्त असलेल्या व दुर्दैवाने आत्महत्येचा मार्ग पत्करलेल्या शेतकरी वर्गाला दिलासा देणारा अत्यंत महत्वपूर्ण कर्जमाफीचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. त्या बरोबरच शेती क्षेत्रांसाठी अनेक महत्वपूर्ण योजनांचीही घोषणा करण्यात आली आहे. शिक्षणावरील खर्चातील वाढीबरोबरच वंचितांसाठी अनेक सोयी-सवलती देवू केल्या आहेत. सर्वसामान्य ग्रामीण भारतीयांचे खरेखुरे प्रतिनिधी असलेले मा. यशवंतराव चव्हाण यांनी नेहमीच शेती, सहकार, शिक्षण याबाबत शांतपणे परंतु ठामपणे क्रांतिकारी निर्णय घेतले होते. याची याप्रसंगी आठवण येते. त्यांचा वसा आणि वारसा खऱ्या अर्थाने पुढे नेणारे प्रतिष्ठानचे अध्यक्ष व देशाचे कृषिमंत्री मा. शरदचंद्र पवार यांनी

महत्वाची भूमिका पार पाडून या प्रकारचे निर्णय केंद्र शासनामार्फत घडवून आणले याची अभिमानपूर्वक नोंद याठिकाणी केली पाहिजे. यामुळे एकूणच ग्रामीण अर्थकारणाला वेगाने चालना मिळून सकल राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्रही महत्वाची भर घालेल याची खात्री वाटते.

प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमाची माहिती नेहमीप्रमाणे याही अंकात आहेच. त्यात मा. खा. सुप्रिया सुळे यांच्या पुढाकाराने महिला बचत गटांसाठी सुरु झालेल्या 'यशस्विनी अभियान' चाही उल्लेख आहे. उत्तम गतिने आकार घेत असलेल्या या अभियानाविषयी पुढील अंकात अधिक सविस्तर आढावा घेऊ.

आज प्रतिष्ठानर्फे दिला जाणारा राष्ट्रीय पुरस्कार देशातील आदरणीय पर्यावरणतज्ज्ञ जोडपे मा. आर. के. पचौरी व श्रीमती सरोज पचौरी यांना प्रदान केला जात आहे. त्यांच्या कार्याविषयी वर्णन असलेले 'सन्मानपत्र' या अंकात देत आहोत. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

यावर्षीच्या यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार शिक्षणक्षेत्रांतील युवा कार्यकर्ते व अभ्यासक श्री. हेरंब कुलकर्णी व एड्सग्रस्तांसाठी कार्य करणाऱ्या श्रीमती वैशाली शिंदे यांना देण्यात आला. त्यांची ही सन्मापत्रे अंकात दिली आहेत. त्यातून त्यांच्या कामाविषयी जाणून घेता येईल.

प्रतिष्ठानच्या विविध स्वरुपी कार्यात प्रतिष्ठानचे पदाधिकारी सभासद, कार्यकर्ते, कर्मचारी व अनेक हितचिंतकांची प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मोलाची मदत होत असते. ती अशीच मिळत राहील या इच्छेसह त्यांना धन्यवाद.

आपला

(दत्ता बाळसराफ)

मानद् संपादक

# मंगल कलश

- स्व. यशवंतराव चव्हाण

प्रतापगड येथे शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ १९५७ मध्ये पं. नेहरुंच्या हस्ते पार पडला. प्रतापगडाचा समारंभ व त्या वेळी झालेली निदर्शने, या निदर्शनांचे नियंत्रण यांचा नेहरुंच्या मनावर चांगला परिणाम झाला. त्यांची अशी खात्री झाली, की माझाही जनतेशी जवळचा संबंध आहे व मी तिचे नेतृत्व करु शकतो. नेहरुंनाही लोकांचे प्रचंड निदर्शन पाहता आले आणि त्यांच्या भावना ओळखता आल्या. निदर्शन प्रचंड होते, पण लोक संयमाने वागले व त्याचाही नेहरुंच्या मनावर परिणाम झाला. आमच्या सभांतूनही ते लोकांशी बोलले. या वेळी त्यांच्या लक्षात आले की, आम्ही जरी द्वैभाषिक राबवित आहोत, तरीही लोकांच्या मनांत काही संदेह आहे.

वाईमार्गे आम्ही पुण्याला येत असता, अनेक निदर्शक पायी वा सायकलवरुन परत फिरत असताना भेटत होते. ते उत्साही होते आणि नेहरुंना पाहिल्यावर ते त्यांचे स्वागत करीत, नमस्कार करीत आणि काही जण 'मुंबई महाराष्ट्राला मिळालीच पाहिजे' अशा घोषणाही करीत. नेहरु हे सर्व पाहत होते आणि त्यांची मन:स्थिती उल्हसित होत होती. लोकांच्या या स्वागताने व घोषणांनी त्यांचा उत्साह वाढला होता. खेळकर वृत्तीने ते निदर्शनांचा विचार करीत असावेत. मला ते हिंदीत म्हणाले की,

'पंजाबीही रागावलेले आहेत (त्या वेळी पंजाबी सुभ्याचा प्रश्न होता.) पण पंजाबीही रागावतात लवकर व विसरतातही लवकर. परंतु तुम्ही मराठी लोक मोठे विलक्षण आहात. तुम्हांला राग येत नाही व आल्यानंतर तुम्ही तो लवकर विसरत नाही.'

नेहरु हे सर्व सद्भावनेनेच बोलत होते.

आम्ही मग पुण्याजवळ आलो. तेथेही निदर्शने झाली आणि स्वागतही झाले. लोक कसल्या घोषणा देत आहेत? असे त्यांनी मला विचारले. तेव्हा मी म्हणालो,

"लोक तुम्हांला दीर्घायुष्य चिंतीत आहेत, पण त्याचबरोबर 'संयुक्त महाराष्ट्र स्थापन करा, महाराष्ट्रापासून मुंबई हिरावून घेऊ नका', असेही म्हणत आहेत."

यावर त्यांनी विचारले,

'मुंबई त्यांच्यापासून कोण हिरावून घेत आहे?'

मी मनात विचार केला, की याचा उपयोग करुन घेता येईल काय?

पुढे मी दिल्लीला गेला असता नेहरुंनी मला सांगितले की,

'हैद्राबादला काँग्रेस महासमितीची बैठक भरेल, तेव्हा तू मला गाजावाजा न करता एकट्याने भेट, मला आता सवड नाही.'

त्यांना माझ्याशी दिल्लीतच बोलावयाचे होते, पण ते अशक्य होते.

नंतर महासमितीचे अधिवेशन हैद्राबादला भरले. त्या वेळी पाकिस्तानात, इस्कंदर मिर्झा यांनी सत्ता ताब्यात घेतली होती.

त्याविषयी ते माझ्याशी बोलत होते. तेवढ्यात मध्येच त्यांनी विषय बदलला व मला ते म्हणाले,

'मी तुझ्याशी काही गोष्टींबाबत चर्चा करीन, असे म्हणालो होतो. मग तुला मी कधी भेटावयास हवे?'

मी सांगितले,

'तुम्ही सांगाल, तेव्हा!'

यावर, 'दुसऱ्या दिवशी दुपारच्या भोजनाच्या थोडे अगोदर आपण महासमितीतून बाहेर पडू व भोजनानंतर विश्रांती घेऊ', असे सांगून त्यानंतर, म्हणजे अडीच वाजता मी यावे, अशी सूचना नेहरुंनी केली.

ठरल्याप्रमाणे मी अडीच वाजता गेलो. नेहरुंनी मला लगेच त्यांची विश्रांतीची जी खोली होती, तीत नेले आणि महाराष्ट्रातील परिस्थितीविषयी माझे मत काय, म्हणून विचारले. तसेच, गुजरात व विदर्भाच्या मंत्र्यांशी माझे कसे संबंध आहेत, अनेक प्रमुख व्यक्तींची नावे घेऊन त्यांच्याशी कसे संबंध आहेत, कारभारयंत्रणा कशा प्रकारे चालू आहे. अधिकाऱ्यांचा प्रतिसाद कसा आहे, असे अनेक प्रश्न त्यांनी विचारले.

मी प्रत्येकाची उत्तरे दिली.

'कारभारयंत्रणा चांगली चालली आहे, विकासाची कामे होत आहेत, परंतु...'

नेहरुंनी विचारले,

'हे परंतु काय?'

मी म्हणालो.

'परंतु लोक समाधानी नाहीत!'

"का नाहीत ?"

या प्रश्नाला मी उत्तर दिले की,

'विकासाची कामे करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे व सरकार ते करील. पण यासाठी द्वैभाषिकाची गरज नाही. अशी लोकभावना आहे व म्हणून ते संतुष्ट नाहीत. तुम्ही इतर मंत्र्यांशी बोलून त्यांचे काय मत आहे, हेही पाहावे. माझ्याबरोबर काम करावयाचे असल्याने ते मला एक सांगत असतील, पण त्यांच्या काही इतरही कल्पना असण्याचा संभव आहे.'

नेहरु यावर हसले आणि अगोदरच यापैकी काही जणांशी बोललो असून, माझे विश्लेषण प्राय:बरोबर, असेही ते म्हणाले.

अशाच प्रकारचे बोलणे झाल्यावर अखेरीस त्यांनी मला विचारले की

'शासकीय दृष्ट्या द्वैभाषिक मुंबई राज्य चांगले चालले आहे, पण राजकीय दृष्ट्या तसे ते चाललेले नाही, हाच तुझा निष्कर्ष आहे ना? हे तुझ्या मनातले आहे, हे खरे काय?'

मी होकार दिला व माझे हे स्पष्ट मत असल्याचेही म्हणालो.

त्यावर -

'तू तुझे मन बोलून दाखविलेस, हे चांगले झाले', असा अभिप्राय देऊन आमच्या संभाषणाबद्दल कोणापाशीही न बोलण्याचा सल्ला त्यांनी मला दिला.

हे संभाषण १९५८ च्या मध्यास झाले. नेहरुंच्या सल्ल्याप्रमाणे मी या संभाषणाची गंधवार्ता कोणालाच लागू दिली नाही. नेहरु साऱ्या प्रश्नाचा फेरविचार करण्याच्या मन:स्थितीत आहेत, याचा अंदाज मला या वेळी लागला.

नेहरुंनी हा विषय त्यांच्या काही निकटवर्तीयांपाशी नंतर काढला असेल. राजकीय परिस्थितीचे मी केलेले विश्लेषण त्यांनी पं. पंत यांना सांगितल्याचेही मला नंतर कळाले.

नेहरु ५८ साली डिसेंबरच्या सुमारास मुंबईत आले होते. त्यांचे उपनगरात कार्यक्रम होते. या कार्यक्रमानंतर दुपारच्या भोजनासाठी राजभवनावर येण्याऐवजी आरे वसाहतीत खास अतिथिगृह आहे आणि तेथे जेवणाची व्यवस्था होऊ शकते, असे मी म्हणालो, तेव्हा नेहरुंनी ते लगेच मान्य केले. भोजनानंतर आपण एखादी डुलकी घेऊ, असेही ते म्हणाले. पण कोणत्याही कारणाने असो, त्यांना झोप आली नाही व त्यांनी बोलावणे धाडले. त्यांची भाची नयनतारा सहगल बरोबर होती. तिला हे माहीत नव्हते. म्हणून या वेळी मी नेहरुंची झोपमोड कशासाठी करता? असे तिने विचारले. नेहरुंनीच बोलावणे धाडल्याचे मी तिला सांगितले. मी खोलीत गेलो, तेव्हा पंडितजी आडवे झाले होते. त्यांनी बसावयाला सांगितले व लगेच हैद्राबादच्या संभाषणाची त्यांनी आठवण दिली आणि विचारले की, 'द्वैभाषिक तोडून दोन स्वतंत्र राज्य केली, तर काँग्रेसला बहुमत मिळेल काय?' महाराष्ट्रात ५७ साली काँग्रेसला कमी जागा मिळाल्या होत्या, त्याचाही त्यांनी उल्लेख केला. मी त्यांना सांगितले, की 'मी याचा विचार केलेला नाही. आणि मी याबद्दल कोणाशी बोललो नाही, पण तुम्हांला याचे उत्तर पुढील बैठकीत देऊ शकेन.' त्यांनी ते मान्य केले, काँग्रेसच्या बहुमताविषयी त्यांना खात्री हवी होती.

काँग्रेसचे अधिवेशन ५९ च्या जानेवारीत नागपूरला झाले. अधिवेशनाचे यजमानपद माझ्याकडे होते. त्यामुळे मोकळा वेळ थोडा मिळत होता. पंडितजी राजभवनावर राहत होते. आमची गाठ पडे, तेव्हा ते त्या मुक्कामात नागपूर व नागपूरच्या लोकांचे प्रश्न यांविषयी विचारणा करीत. नागपूर सोडण्यापूर्वी आदल्या संध्याकाळी त्यांनी मला बोलावणे धाडले आणि द्वैभाषिक तोडल्यावर काँग्रेसला बहुमत मिळेल, की नाही, याचा हिशेब केला, की नाही, असे त्यांनी विचारले. मी होकार देऊन बहुमत मिळेल, असे म्हटले. 'हे कसे शक्य आहे?' असे त्यांनी विचारल्यावर मी सांगितले, की

'तांत्रिकदृष्ट्या आम्ही अल्पमतात आहोत, पण विरोधकांतले निदान पंधरा सदस्य केवळ महाराष्ट्राच्या प्रश्नावरच विरोधी पक्षात आहेत. पण द्वैभाषिक तोडले जात असून, महाराष्ट्र स्थापन होत आहे, हे जर त्यांना कळले, तर हे पंधराजण तरी काँग्रेसला पाठिंबा देतील, ते काँग्रेसमध्ये येतील, की नाही, हे सांगता येणार नाही, पण तेही शक्य आहे.'

पंडितजी म्हणाले,

'मला त्यांची नावे कळण्याची गरज नाही, पण हे सर्व शक्य आहे, असे तुझे निश्चित मत आहे काय?'

मी म्हणालो,

'होय!'

त्यावर मे मध्ये किंवा मार्च वा एप्रिलच्या प्रारंभी मोरारजीभाईच्याबरोबर एक बैठक करावी लागेल आणि त्यांच्याशी बोलून, चर्चा करुनच जे काही ठरवावयाचे, ते ठरवावे लागेल, असे ते म्हणाले. मी अर्थातच हे मान्य केले आणि मग मार्च अखेरीस व एप्रिलच्या प्रारंभी ही बैठक घेण्याचा बेत ठरला.

पुढे मार्चच्या मध्यावर माझी प्रकृती बिघडली. मला किडनीचा विकार झाला होता आणि शस्त्रक्रिया करणे भाग पडले. ती होऊन मला बरे वाटेपर्यंत जून-जुलैत मी मुंबईस कामावर परतलो. नेहरु माझ्याशी बोलले व आजारपणामुळे द्वैभाषिक प्रश्न मागे पडला व आता त्याबद्दल केव्हा चर्चा करावयाची, याची त्यांनी चौकशी केली. ऑगस्टमध्ये ती करणे बरे, असे मी सांगितले. ते त्यांना मान्य झाले. मी १९ वा २० ऑगस्टला दिल्लीत यावे, असे त्यांनी सुचविले. तत्पूर्वी निदान काही प्रमुख व्यक्तींशी चर्चा करणे बरे, असे मत मी बोलून दाखविले. तेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी याबद्दल काय ते ठरवू, असे त्यांनी उत्तर दिले व मला दिल्लीला बोलावले.

दिल्लीला निघण्यापूर्वी मी मोरारजीभाईकडे फोन केला. नेहरुंनी मला बोलावले असून द्वैभाषिक राज्याचा आढावा त्यांना घ्यावयाचा आहे व तुमची हजेरी अपेक्षित आहे, असे मी कळविले. मी मोरारजीभाईशी बोललो, की नाही हे, आठवत नाही.पण त्यांच्याकडेच मी उतरत आलो होतो व याहीवेळी त्यांच्याकडे उतरावयाचे होते. मी त्यांच्या कुटुंबातल्यासारखाच होतो. मोरारजीभाईशी बोलून मी निरोप दिला, की नाही, हे आठवत नसले, तरी त्यांचे चिटणीस श्री. टोणपे यांच्याशी बोललो, हे निश्चित. टोणपे हे माझे दिल्लीतील मित्रच होते. दुसऱ्या दिवशी मी दिल्लीत आलो, तेव्हा विमानतळावर मला घेण्यासाठी टोणपे आले होते. त्यांनी सांगितले की, मोरारजीभाई संसदेत गेले आहेत आणि पंडितजींना भेटण्यापूर्वी मी त्यांना भेटावे. मोरारजीभाईंच्या सवडीने मी त्यांना भेटेन, असे मी टोणपे यांना सांगितले, त्याप्रमाणे चारच्या सुमारास मला त्यांच्याकडून बोलावणे आले.

मोरारजीभाई रागावले नव्हते, पण अस्वस्थ होते. त्यांनी मला एकंदर परिस्थितीचा आढावा काय, असा प्रश्न केला. मी माझे मत दिले. मोरारजीभाईनी ते ऐकून घेतले. त्यांनी राग वा विरोध व्यक्त केला नाही. त्यांना वाईट मात्र वाटले होते. मी त्या वेळच्या त्यांच्या वृत्तीचे जरुर कौतुक करतो. अर्थात आपल्याला वाईट वाटले, हेही त्यांनी मला सांगितले नाहीच. दुसऱ्या काही मित्रांना सांगितले. तसे ते अतिशय संयमी वृत्तीचे आहेत. माझे मत ऐकून घेतल्यावर मोरारजीभाई म्हणाले,

'हे तुमचे प्रामाणिक मत असेल, तर मी याबद्दल काही बोलू शकत नाही. परंतु हे सर्व दु:खद व दुर्दैवी आहे, हे मात्र खरे!'

त्यानंतर आम्ही उगाच इकडच्या - तिकडच्या गोष्टी उपचारार्थ केल्या.

रात्री आम्ही दोघेही मोरारजीभाईंच्या घरी एकत्र जमलो व एकाच मोटारीतूनपं. गोविंद वल्लभ पंत यांच्याकडे गेलो.

पंडितजी तेथे आले होते व याप्रकारे आम्ही चौघेच जमलो होतो. आम्ही बसताच पंडितजी म्हणाले,

'चव्हाण, तुमचा काय आढावा असेल, तो सांगा, पाहू...'

त्यावर मी माझ्या दृष्टिकोनातून परिस्थितीचे विश्लेषण केले. मी सांगितले की,

'गुजराती समाजाबरोबर आमचे संबंध चांगले आहेत. कारभारयंत्रणाही ठीक रीतीने चालू आहे. मराठी व गुजराती समाजांतील तणावही बराच नियंत्रणाखाली आहे. पण दोन्ही समाज सध्याच्या व्यवस्थेबाबत समाधानी नाहीत. द्वैभाषिकाचा प्रयोग चालू ठेवण्याची माझी तयारी आहे. पण लोक खूश नाहीत.'

यावर -

'गुजरातीही समाधानी नाहीत, हे कसे मी म्हणतो?' असे मला विचारण्यात आले.

मी उत्तर दिले,

'मी मुख्यमंत्री आहे आणि रोजच्या अनुभवावरुन मी हे सांगतो. मुख्यमंत्री या नात्याने ५७ साली मी अहमदाबादला गेलो, तेव्हा अत्यंत उग्र निदर्शने झाली आणि गोळीबार करावा लागला. त्यानंतर मी न्यायालयीन चौकशीचा आदेश दिला. न्यायमूर्ती कोतवाल यांनी चौकशीसाठी नेमण्यात आले. या आयोगापुढे जाऊन मी लेखी कैफियत दिली व सर्व जबाबदारी माझ्याकडे घेतली. नंतर या आयोगाचा अहवाल आला, तेव्हा त्याने माझी प्रशंसा केली.'

गुजरात काँग्रेसचे कार्यकर्ते चांगले सहकार्य देतात, हेही खरे असल्याचे मी स्पष्ट केले, पण लोक समाधानी नाहीत, याची जाणीव करुन दिली.

यावर पंतजी म्हणाले की,

'चव्हाण मुख्यमंत्री आहेत व ते आपले अनुभव सांगत आहेत.'

त्यामुळे एकंदर रागरंग मोरारजीभाईंच्याही लक्षात आला.

मग पंतजींना विचारण्यात आले,

'पुढे काय?'

ते म्हणाले,

'चव्हाण यांना जर याप्रकारे वाटत असेल, तर आपल्याला काही करावे लागेल.'

मग मोरारजीभाईना त्यांचे मत देण्यास सांगण्यात आले. मोरारजीभाई म्हणाले,

'द्वैभाषिक राज्य मोडण्याची कल्पना मला मान्य नाही. ती माझ्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे. तेव्हा पक्षाने द्वैभाषिक मोडावे, असे मी सांगणार नाही; पण चव्हाणांचे मत वेगळे आहे आणि आपल्याला याचा विचार करावा लागेल', एवढे बोलून त्यांनी जगाच्या इतिहासातील द्वैभाषिक राज्यांची उदाहरणे दिली.

मी मग म्हणालो,

'द्वैभाषिक राज्याचा प्रयोग चांगला आहे. मोरारजीभाई म्हणतात, यात काही चूकही नाही, परंतु द्वैभाषिकाचा प्रयोग करण्यासाठी आमचीच का निवड केली, असे लोक विचारतात आणि त्यांच्या मनाला ते डाचते. इतरांचा हक्क आपण मान्य केला आहे, मग आमचा का नाही? असा त्यांचा प्रश्न. निदान मराठी लोकांना हे फार बोचते. त्यांच्याशी या संबंधात तर्कसंगत चर्चा करणे शक्य नाही.'

मोरारजीभाई म्हणाले,

'इतर राज्यांबाबतही हा प्रयोग करण्याची कल्पना होती, पण कोणी मानली नाही. तामिळनाडू व केरळ यांचे एक राज्य करण्याची सूचना झाली होती, पण कामराज यांनी ती मानली नाही.'

हा प्रश्न निघाला, तेव्हा कामराज कसे बसले होते व ते 'नाही, नाही' एवढेच कसे म्हणाले, याची नक्कलच मोरारजीभाईंनी केली.

मी पुन्हा सांगितले की,

'द्वैभाषिकाच्या मी विरुद्ध नाही, पण हा प्रयोग केला आणि तो फसला.'

यानंतर बैठक संपली. ही बैठक निर्णायक होती.

सकाळी मी मुंबईला परतलो.

त्यादिवशी दिल्ली, मुंबई, अहमदाबाद वगैरे ठिकाणच्या वृत्तपत्रांत या बैठकीची बातमी ठळकपणे आली. पंडितजींनी घेतलेल्या बैठकीचा हा वृत्तांत कदाचित त्यांच्या वर्तुळातून प्रसिद्धीला दिला गेला असेल. मी मुंबईला पोहोचलो, तेव्हा मला बरेच लोक भेटावयास आले. विधानसभेचे अधिवेशन चालू होते. माझ्या मंत्रिमंडळातील मंत्री डॉ. जीवराज मेहता यांना वाटले, की विधिमंडळाचा हा विश्वासभंग झाला. मी त्यांना सारा इतिहास निवेदन केला, पण ऑगस्ट-सप्टेंबरपासून वेगळीच अडचण उभी राहिली. काँग्रेसचे अध्यक्ष होते ढेबर. त्यांच्या द्वैभाषिक तोडण्यास विरोध होता. गुजरातच्या लोकांना ही बदललेली भूमिका आम्ही कशी पटवणार, असे त्यांनी नेहरुंना विचारले. पंडितजींच्या स्वभावाचे एक वैशिष्ट्य होते. अशा वेळी ते शिंपल्यात जाऊन बसतात. तसे ते बसले. इकडे लोकांना द्वैभाषिकाच्या फेरविचाराची योजना समजली होती; पण हालचाल होत नव्हती. हा फेरविचार करण्याचे पाऊल कसे टाकावयाचे, हे मी नेहरुंना विचारले. तेव्हा ढेबर व मोरारजीभाईचे मत त्यांनी मला ऐकविले आणि मीच या

संबंधात शंकासमाधान केले पाहिजे, असे म्हणाले. आता जर द्वैभाषिकाचा फेरविचार केला गेला नाही, तर काय होईल, या विचाराने मला धडकी भरली, मी अस्वस्थ झालो.

याच सुमारास विदर्भात असंतोष माजला. मी शहाणपणाने महाराष्ट्र मिळविला, पण आता आपल्याला गुलाम केले जाईल, असे तेथील काही लोकांना वाटू लागले. त्यांना राग आला. लोकनायक अणे वगैरे याप्रमाणे बोलत होते. अशा प्रकारे दोन प्रश्न निर्माण झाले आणि त्यावर मीच तोडगा काढावा, असे पंडितजी सांगत होते. मग मी विदर्भातील माझ्या सहकाऱ्यांना बोलावून पंडितजींचे म्हणणे सांगितले. त्यावर वसंतराव नाईक, शेषराव वानखेडे, नासिकराव तिरपुडे, काझी या विदर्भाच्या मंत्र्यांनी चांगली भक्कम भूमिका घेतली. ते म्हणाले,

'आपण दिल्लीत जाऊ. खासदार वगैरेंना भेटू आणि महाराष्ट्र राज्यात आपल्याला राहावयास हवे, असे त्यांना सांगू.'

मी हे मान्य केले; पण सांगितले, 'जे इतर सहकारी आपल्याविरुद्ध आहेत, त्यांच्याविरुद्ध काही करु, बोलू नका.' हे सर्वांनी कबूल केले व मग हे माझे सहकारी अनेकांच्या गाठीभेटी घेऊ लागले.

मी कन्नमवारांनाही बोलावले व विदर्भाच्या चळवळीबद्दल बोललो.

ते म्हणाले,

'मी जाहीररीत्या विदर्भाबद्दल बोललो आहे, तेव्हा मला माघार घेता येणार नाही. पण मी तुमच्याविरुद्ध जाणार नाही.'

मग हे कसे करावयाचे, असे मी विचारले. तेव्हा दोन्ही भागांतील दोन-दोन तीन-तीन काँग्रेसजनांची एक समिती नेमावी व या प्रश्नाचा विचार करुन तिने काही ठरवावे, अशी सूचना कन्नमवार यांची होती, ती मी मान्य केली.

तथापि, एकट्या महाराष्ट्र-विदर्भापुरता हा प्रश्न नव्हता. गुजरातमध्येही काही हालचाल करावयास हवी होती. त्या वेळी मोरारजीभाई मुंबईत आले असता मी त्यांची भेट घेतली. मी त्यांना म्हणालो,

'मोरारजीभाई, द्वैभाषिक मोडून दोन राज्ये करण्याचा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला आहे. आता जर काहीच न करता आपण स्वस्थ बसलो, तर परिस्थिती बिकट होईल.'

मग काय करावे, असे त्यांनी विचारले.

मी म्हणालो,

'तुम्हांला द्वैभाषिक तोडण्याची कल्पना तत्त्वत: मान्य नाही, आपला विश्वासभंग झाला, असे तुम्हांला वाटते. पण आपण वस्तुनिष्ठ विचार केला पाहिजे. म्हणून दोन राज्ये सद्भावनेने कशी करावीत, हे ठरविण्याची आता गरज आहे. आपण दोघे एकत्र बसून तोडगा काढू.'

मोरारजींनी याला मान्यता दिली. 'पण दिल्लीच्या नेत्यांचा सल्ला घेतला काय? असे त्यांनी विचारले. मी "नाही" म्हणून सांगितले, तसेच, पंडितजींशी सल्लामसलत करण्याची गरज नाही, असेही म्हणालो. याचे कारण माझे मला माहीत होते.

नेहरुंनी या संबंधात स्वत: हालचाल न करण्याचे ठरविले होते, पण मोरारजीभाईंनी मला दिल्लीच्या नेत्यांशी चर्चा करण्याचा आग्रह केला आणि आपणही गुजराती नेत्यांशी बोलू, असे ते म्हणाले.

मी मग दिल्लीत गेलो आणि विदर्भ व गुजरात यांच्याबाबत कोणत्या मार्गाने मी पावले टाकीत आहे, हे पंडित पंत यांना निवेदन केले. त्यांना हे पसंत पडले व मला, "आगे बढो", असे त्यांनी सांगितले. नेहरुंना आपण खुलासा करु, असेही ते म्हणाले.

मी नंतर मुंबईला परतलो.

आठवडाभराने मोरारजीभाईंनी मला दिल्लीत बोलावले. त्याप्रमाणे मी गेलो. तेव्हा मोरारजीभाई म्हणाले,

'गुजरातच्या राजधानीचा व डांगच्या भवितव्याचा विचार केला पाहिजे.'

मी हे मान्य केले व सहकाऱ्यांशी चर्चा करतो, असे सांगून मुंबईला परतलो.

मुंबईला आल्यावर मी विचारविनिमय सुरु केला. भाऊसाहेब हिरे यांनी मी बोलाविले व गुजरातच्या राजधानीसाठी पैसे द्यावे लागतील, इतरही काही रक्कम तोडून द्यावी लागेल, हे मी त्यांना स्पष्ट केले. ते म्हणाले की, याबाबत काही जबाबदारी घेण्याची आपली तयारी नाही. इतरही काही कार्यकर्त्यांची हीच भूमिका होती. मी या आर्थिक प्रश्नाबाबत तोडगा काढण्यासाठी काही अधिकाऱ्यांना सांगितले. तसेच, माझ्या बाजूला आणखी एक घटक होता. तो असा:

द्वैभाषिक राज्यात महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही भागांतून विरोधी पक्ष होते. त्यांच्या चर्चा चालत. एकत्र येऊन या राज्याला विरोध करण्याचे त्याचे बेत होत होते. अशा एका चर्चेच्या वेळी डांग गुजरातला देण्याची डांगे यांनी तयार दर्शविली होती. मला याची माहिती होती. मी मग माझ्या अनेक पक्ष-सहकाऱ्यांना बोलावले. विरोधी पक्षांची डांगबद्दल काय भूमिका आहे, हे मी त्यांना स्पष्ट केले. मी असेही सांगितले, की डांग गुजरातला देण्यास माझा व्यक्तिश: विरोध आहे, पण आपण या प्रश्नावर बोलणी तोडणार काय? माझी स्वत:ची भूमिका व्यवहार्य आहे. या प्रश्नावर बोलणी तोडू नयेत, असे मला वाटते.

हे सहकारी म्हणाले,

'आम्हाला मुंबई मिळत आहे, तेव्हा तुम्हीच काय ते ठरवा, महाराष्ट्र ते मान्य करील.'

द्वैभाषिक तोडल्यावर आर्थिक नुकसानभरपाई, राजधानी बांधण्याचा खर्च, इत्यादी किती रक्कम द्यावी लागेल, याचा अभ्यास मी काही अधिकाऱ्यांना करावयास सांगितला होता. आंध्र व मद्रास राज्यांची फारकत झाली, तेव्हा यासंबंधीचा पद्धत ठरली होती.

याप्रमाणे तीसएक कोटी द्यावे लागतील, असे मला सांगण्यात आले. एवढी रक्कम द्यावयाची, हे मराठी मनाला मानवणारे नव्हते. काही सहकाऱ्यांनी याबद्दल चिंता व्यक्त केली. तेव्हा एकट्या मुंबईतील विक्रीकर २५-३० कोटींच्या घरात जातो, तर मग ५० कोटी द्यावे लागले, तर दोन वर्षांत ती

रक्कम मुंबईच्या विक्रीकरातूनच वसूल होईल, असा युक्तिवाद मी केला व तो माझ्या सहकाऱ्यांनी मान्य केला. काय रक्कम द्यावयाची असेल, ती तुम्ही ठरवा व हा प्रश्न मिटवा, असे त्यांचे मत पडले.

मी लगेच दिल्लीत गेलो. मोरारजीभाईना डांग देण्याची तयारी असल्याचे सांगितले. राजधानी बांधण्यासाठी खर्च देण्याचे मान्य केले. हा खर्च व बाकीची भरपाई याचे कोष्टक आंध्र व मद्रासची फारकत झाली, त्या धर्तीवर असावे, असे मी सांगितले व त्यांनी अधिकाऱ्यांकडून याची तपासणी करावी, अशी सूचना केली. तेव्हा महाराष्ट्र व गुजरात यांच्याकडून दोन दोन अधिकारी व रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर अशा पाचजणांची समिती नेमली गेली. आमच्या बाजूने बर्वे व यादी होते. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर तेव्हा भट्टाचार्य होते. राजधानी बांधण्याच्या खर्चाचा प्रश्न समितीकडे न सोपविता आपण आपापसांत सोडवू, असे मोरारजीभाई म्हणाले, तेव्हा मी तात्काळ मान्यता दिली व आंध्र व मद्रासच्या धर्तीवर सात कोटी रुपये देण्याची तयारी दर्शविली. मोरारजीभाई म्हणाले,

'नाही, दहा कोटी हवेत.'

मी ते कबूल केले. ही रक्कम द्वैभाषिक राज्याच्या अर्थसंकल्पातून येईल, असेही मी म्हणालो व ते मोरारजींना मान्य होते.

मी हिशेब केला, की द्वैभाषिकाच्या अर्थसंकल्पातून ही रक्कम येणार, म्हणजे महाराष्ट्रावर केवळ सात कोटींचाच बोजा पडेल!

पुढे मी पुन्हा दिल्लीला गेलो, तेव्हा चव्हाणांनी माझ्याशी चांगला व्यवहार केला, असे मोरारजींना काही जणांना सांगितल्याचे मला कळले. पंडितजी वगैरेंच्या मध्यस्थीशिवाय आपापसांत हा प्रश्न सोडविता आला, याचे त्यांना समाधान होते. मी पंतांना सर्व हकीगत निवेदन केली. विदर्भाबाबत एक समिती नेमली आहे व ती तोडगा काढील, असेही त्यांनी सांगितले. त्यांनी मग मी पंडितजींना भेटून सर्व निवेदन करावे, असे सुचविले. त्याप्रमाणे मी नेहरुंना भेटलो. माझी हकीगत ऐकून त्यांना आनंद झाला.

ते म्हणाले,

'आता आपल्याला पुढचे पाऊल टाकण्यास हरकत नाही.'

विदर्भाबाबत' नऊजणांची समिती नेमली होती. तीत महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भाचे प्रतिनिधी होते व पं. पंत अध्यक्ष होते. आमच्या दोन-तीन बैठका झाल्या व आम्ही एकमताने अहवाल तयार केला. विदर्भ महाराष्ट्रात राहावा, हे मान्य झाले व काही आश्वासने देण्यात आली. महाराष्ट्र राज्य स्थापनेचा मार्ग मोकळा झाला.

( **शब्दाचे सामर्थ्य** या मा. राम प्रधान यांच्या ग्रंथातून )

## YASHWANTRAO CHAVAN NATIONAL AWARD FOR NATIONAL INTEGRATION, DEMOCRATIC VALUES, OR SOCIAL AND ECONOMIC DEVELOPMENT IN INDIA, 2007

### CITATION

**Dr. Rajendra K. Pachauri and Dr. Saroj Pachauri**

Dr. Pachauri who was born in Nainital on 20th August 1940 commenced his career with the Diesel Locomotive Works, Varanasi in a managerial position. He joined the North Carolina State University in Raleigh, USA where he obtained an MS in industrial engineering in 1972. Then he continued his studies and obtained Ph.D. in economics. He also served there as Assistant Professor and subsequently, as Visiting Faculty Member in the Department of Economics and Business.

On his return to India, he joined the Administrative Staff College in India, Hyderabad as Member Senior Faculty. He became Director, Consulting and Applied Research Division and continued in that position till he joined TERI (The Energy and Research

Institute) as Director in April 1981. This renowned Institute is engaged in original research in the fields of energy, environment, forestry, biotechnology and the conservation of natural resources. It disseminates scientific information on these subjects to Governments, Institutions and Corporate Organizations all over the world.

In April 2002, Dr. Pachauri was elected the Chairman of the Inter Governmental Panel on Climate Change (IPCC), established by the World Meteorological Organization and the United Nations Environment Programme, 1988. Dr. Pachauri's long association with the subjects of energy, environment and climate change reached a fitting climax when the IPCC along with the former Vice President, USA, Al Gore was awarded the Nobel Peace Prize for the year 2007. This was in recognition of their efforts to gather and disseminate greater knowledge about man-made climate changes and laying out policies for concerted action by humanity to counteract the deleterious effects of these changes. This acknowledgement of the work of IPCC has brought to the forefront

the issues of climate change, global warming, melting of glaciers, increase in sea levels etc. and the fact that there is considerable scientific consensus on the assessment that human activities are contributing substantially to these changes. A silver lining to the dark clouds is that hopefully humanity can act together to set in motion enlightened policies and programmes which, however unpalatable in the short run, can reverse and limit the damage to global environment and eventually pursue the path of sustainable development.

Dr. Pachauri's leadership of the academic and technical work in this field was recognized even earlier. He has been a Visiting Professor, Resource Economics at the West Virginia University, Senior Visiting Fellow, Resource Systems Institute, East-West Center, USA and Visiting Research Fellow at the World Bank. From 1994 to 1999, he has worked as Part-time Adviser to the Administrator of United Nations Development Programme in the fields of energy and sustainable management of natural resources. To acknowledge his sterling contribution to the field of

environment, he was awarded the Padmabhushan by the Government of India in January 2001 and Padmavibhushan in 2007.

Dr. Pachauri has held important positions in several National and International Committees and Boards. To mention only a few, he has been Adviser, International Advisory Board, Toyota Motor Corporation, Japan; Member, Board of the International Solar Energy Society; Member, World Resources Institute Council and President, Asian Energy Institute. He has been regularly contributing to the Economic Advisory Council to the Prime Minister of India.

He has been associated with numerous Academic Research Institutes as well as the Boards of several large Corporations, including ONGC, National Thermal Power Corporation Ltd., Indian Oil Corporation, and GAIL. He has been actively connected with the India International Centre and the India Habitat Centre. In 1999, he was appointed Chairman of Darjeeling Himalayan Railway Heritage Foundation. He has authored 23 books and several papers and articles.

It can thus be seen that the conferment of the Noble Peace Prize on the IPCC of which he has been the Chairman was well-deserved culmination of his long and dedicated career in the fields of energy and environment.

It is often said that behind every successful man, there is a woman. But the world and the times have changed. It is not uncommon to see that behind every successful woman, there is a man. ~~However, here is a couple which is treading the path of successful woman, there is a man~~. However, here is a couple which is treading the path of success together, though to different destinations.

Dr. Saroj Pachauri was born in Rawalpindi, Punjab. After partition, her family moved to New Delhi. She studied in the Jesus and Mary Convent School and the Hindu College, following which she studied in the Lady Hardinge Medical College, Delhi University. During this period, she studied Indian classical vocal music. She has a passion for the fine arts, including music, painting and writing.

As a community health physician, she has been very active in research on population, reproductive health and maternal and child health. She began her career as a Faculty Member of the Lady Hardinge Medical College, from which she had graduated. During her stint as Faculty Member, Dr. Saroj Pachauri was instrumental in the establishment of the Departments of Preventive and Social Medicine, which were new disciplines at that time in India. From 1971-83, Dr. Saroj Pachauri worked with the International Fertility Programme which was later named Family Health International, an international, non-profit, non-government organization.. For the first five years, she worked in North Carolina USA and subsequently in India. During these years, she led a research programme on International Health. She designed, monitored and evaluated clinical trials to assess the safety and effectiveness of contraceptive technologies in countries in Asia, Africa, Latin America, the Middle East and Europe.

During 1983-94, she worked with the Ford Foundation. She initiated and implemented the Foundation's Child Survival and

Reproductive Health and Population Programmes. She pioneered work on HIV and AIDs. She was instrumental in designing national programme on HIV / AIDs when National AIDS Control Organization was established.

Since 1995, Dr. Saroj Pachauri has held the position of Asia Regional Director, Population Council. The Council, established in 1952, is the oldest and largest international non-profit non-government organization that undertakes research on population, reproductive health and related issues globally.

She has published extensively on policy and implementation issues related to population, sexual and reproductive health, adolescent health, gender, HIV and AIDS, family planning and maternal and child health. She has to her credit about 100 publications in the form of books and peer-reviewed articles in renowned journals. She writes extensively for the news and other media. She has served on the committees and boards of several prestigious international and national organizations. In her various

capacities and through various institutions, Dr Saroj Pachauri has been striving to achieve the goal of improving the lives of the poor by promoting their health and reducing socio-economic and gender disparities in developing countries.

It can be truly said that both Dr. R.K. Pachauri and Dr. Saroj Pachauri have dedicated their lives and careers to improving the lot of the common man in developing countries which tend to suffer from imbalances in allocation of the world's resources and from shortcomings and inadequacies in policies pursued by them in the fields of health, energy and environment. It is, therefore, a matter of great pleasure for the Yashwantrao Chavan Pratishthan to confer the Yashwantrao Chavan National Award for National Integration, Democratic Values or Social and Economic Development for the year 2007 jointly on Dr. R.K. Pachauri and Dr. Saroj Pachauri.

| | | |
|---|---|---|
| Mumbai | Justice Y.V. Chandrachud | Sharad Pawar |
| 12th March, 2008 | Chairman | President |
| | Panel of Jury | Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai |

# नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि अपंग हक्क विकास मंच

## ★ कार्यवृत्त ★

नवमहाराष्ट्र युवा अभियानचे काम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक श्री. विश्वास ठाकूर तसेच अपंग हक्क विकास मचांचे समन्वयक श्री. विजय कान्हेकर व सहकारी सुरेश पाटील, मिनल सावंत हे पहातात.

**दि. २ ऑक्टो. २००७ :** जिल्हा शिल्यचिकित्सक, जिल्हा रूग्णालय, ठाणे व अपंग हक्क विकास मंच द्वारा आयोजित जिल्ह्यातील गरजू अपंगांना मोफत अवयव वाटपाचे शिबिर : वेळ सकाळी १०.३० ते दुपारी २.०० अभियानचे शंकर साळवे, सुरेश पाटील, अनिल चाळके इ.नी या कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी पार पाडली. एकूण ३० अपंगांना मोफत कृत्रिम अवयव देण्यात आले.

**दि. २५ ऑक्टो. २००७ :** राष्ट्रीय विकलांग वित्त व विकास फरीदाबाद, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र पुणे व महाराष्ट्र राज्य अपंग व वित्त विकास महामंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय अपंगांसाठी फळबाग लागवड प्रशिक्षण व अर्थसहाय्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. स्थळ : बाल कल्याण संस्था, पुणे प्रमुख उपस्थिती मा. खा. सुप्रियाताई सुळे, मा. आर. के. गायकवाड. आयुक्त, अपंग कल्याण, मा. वसंत संख्ये, कार्यकारी संचालक, अपंग वित्त व विकास महामंडळ, दत्ता बाळसराफ, विजय कान्हेकर, अंजली काटे, सुरेश पाटील, अनिल चाळके, शमीम खान इ. या कार्यक्रमास उपस्थित होते.

**दि. ६ व ७ नोव्हे २००७ :** अपंग हक्क विकास मंचाच्या वतीने येत्या एप्रिल, मे महिन्यामध्ये अपंग हक्क आढावा परिषद बारामती येथे आयोजित करण्यात येणार आहे. त्याच्या पुर्वतयारीसाठी बारामती येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मा. खा. सुप्रियाताई सुळे, प्राचार्य अडसुळ सर यांच्याबरोबर ही बैठक झाली. यासाठी संयोजक मा. दत्ता बाळसराफ समन्वयक, मा. विजय कान्हेकर सहसंयोजक, मा. विश्वास ठाकूर इत्यादी हजर होते.

**दि. १८ नोव्हे. २००७ :** कायदेविषयक सहाय्यक व सल्ला फोरम आणि कुळगाव - बदलापूर अपंग विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अपंग व्यक्तीसाठी एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला अॅड. म. बा. पवार, अॅड. प्रमोद ढोकळे, अॅड. अजय केतकर अॅड. भूपेश सामंत, अॅड. दिलीप तळेकर, डॉ. पी. बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे आयोजन अभियानचे श्री. अनिल चाळके यांनी केले. अध्यक्षपद कुळगाव-बदलापूर नगर परिषदेचे मा. श्री. नंदकिशोर उर्फ राम पातकर यांनी भूषविले. प्रास्ताविक डॉ. राजेश अंकुश तर आभार प्रदर्शन श्री. प्रमोद पाडावे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता देसाई, श्याम गायकवाड, सौ. शशिकला गायकवाड, कु. श्वेता श्रीवास, रवि त्रिभुवन, कमलेश पांचाळ यांनी सहकार्य केले.

**दि. २५ नोव्हे. २००७ :** प्रतिवर्षीप्रमाणे दिला जाणारा राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण पुरस्कार प्रदान सोहळा चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात पार पडला. मा. श्री. अनिल काकोडकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी युवा अभियानचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

**दि. २ डिसें. २००७ :** नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य संस्थेचे अध्यक्ष माजी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त व्यसन मुक्तांचा संकल्प मेळावा महात्मा गांधी सेवा मंदिर हॉल, वांद्रे(प.) येथे आयोजित करण्यात आला होता. समाजकार्यकर्ता प्रशिक्षण वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला होता. याच्या आयोजनाची जबाबदारी रमेश सांगळे व नारायण परब यांनी पार पाडली.

**दि. २ डिसें. २००७ :** पानिपत प्रतिष्ठान व जिल्हा प्रशासन पानिपत यांच्या संयुक्त विद्यमाने पानिपत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहून तसेच दिल्लीतूनही अनेक इतिहासप्रेमी व मराठीभिमानी एकत्र आले होते. हरियाणा केडरचे भारतीय प्रशासन सेवेचे अधिकारी श्री. अजित जोशी (आय.ए.एस.) यांच्या नेतृत्वाखाली प्रत्यक्ष युद्ध भूमीवर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात सुमारे एक हजार व्यक्तींनी भाग घेतला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अभियानचे सुरेश पाटील यांनी सक्रिय भाग घेतला.

**दि. १० डिसें. २००७ :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या माध्यमातून सुरू होणाऱ्या यशस्विनी अभियानची, महाराष्ट्रातील विभागीय/ जिल्हा/ तालुका समन्वयकांची एक दिवसीय कार्यशाळा मा. सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर येथे आयोजित आली होती. या कार्यशाळेसाठी अभियानाचे सुरेश पाटील, विजय कान्हेकर इ. उपस्थित होते. कार्यशाळेचे आयोजन सौ. सुरेखा ठाकरे, श्री. दिलीप कोल्हे व अभियानचे सहसंयोजक श्री. विश्वास ठाकूर यांनी केले होते.

**दि. १५ डिसें. २००७ :** कुसुमताई चौधरी महिला कल्याणी संस्थेच्या वतीने तापडिया नाट्यगृह औरंगाबाद येथे दि. १५ व १६ डिसें. रोजी 'कुसुमांजली स्त्री कथी' या मराठी कथा लेखिकांचे साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचे निमंत्रक म्हणून आंदोलनाचे कार्यकर्ते श्री. विजय कान्हेकर, व्यवस्थापक म्हणून सुहास तेंडुलकर तर समन्वयक म्हणून श्री. निलेश राऊत व संयोजक म्हणून श्री. दत्ता बाळसराफ हे होते. ज्येष्ठ साहित्यिक मा. कमल देसाई या अध्यक्षस्थानी होत्या. या साहित्य संमेलनासाठी युवा अभियानचे सुरेश पाटील, जयंत व प्रज्ञा सागडे, उमाकांत जगदाळे इत्यादी उपस्थित होते.

**समाजकार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग २००७-२००८**

प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. या प्रशिक्षण वर्गाचे समन्वयक म्हणून श्री. रमेश सांगळे, श्री. अनिल चाळके व श्री. विरेंद्र भाट यांनी सहकार्य केले.

| दिनांक | विषय | |
|---|---|---|
| | प्रथम सत्र | द्वितीय सत्र |
| ०७/१०/०७ | वस्ती, समाज संघटन | संवाद कौशल्ये |
| २८/१०/०७ | व्यसन व व्यसनमुक्ती मार्गदर्शन | व्यसन व व्यसनमुक्ती मार्गदर्शन |
| ०४/११/०७ | मानवी समाजाचा इतिहास | रेशनिंग, ग्राहक चळवळ |
| १८/११/०७ | बाल हक्क अभियान | फुले, शाहू, आंबेडकरी चळवळ |
| ०९/१२/०७ | भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये | प्रिंट मिडिया (छपाई माध्यम) |
| २३/१२/०७ | ध्येय निश्चिती, संस्था नोंदणी | नियोजनाचे टप्पे, प्रकल्प प्रस्ताव, फंड उभारणी |
| ०६/१/०८ | विमा क्षेत्र - विविध योजना | पोलिस यंत्रणा |
| २३/१/०८ | असंघटित कामगार चळवळ | महिला बटतगट व कार्य |

**दि. १२ जाने. २००८ :** नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे प्रतिवर्षी महाराष्ट्राचे सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व भरीव कार्य करणाऱ्या दोन व्यक्तींना (एक युवक व एक युवती) **यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार** देऊन सन्मानित

करण्यात येते. अकरा हजार रुपये रोख व सन्मानपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप होते. सन २००७ चा युवा पुरस्कार युवकांमध्ये मा. श्री. हेरंब कुलकर्णी यांना तर युवतीमध्ये मा. वैशाली शिंदे यांना जाहिर करण्यात आला. यावेळेस यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन साहित्य स्पर्धेतील पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आली. हा कार्यक्रम कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु, मा. डॉ. पंकज चांदे तसेच भारतीय प्रशासकीय सेवेतील हरियाणा केडरचे अधिकारी मा. श्री. अजित जोशी यांच्या हस्ते व मा. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. नवमहाराष्ट्र युवा अभियानचे संयोजक दत्ता बाळसराफ, सहसंयोजक विश्वास ठाकूर, अपंग हक्क विकास मंचाचे विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, सुरेश पाटील, निलेश राऊत, शंकर साळवे तसेच नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या नागपूर विभागाचे संघटक अभिजित राऊत, या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमास विभागीय केंद्र नागपूरचे सचिव मा. गणेश नायडू व श्री. नितीन राऊत यांचे या कार्यक्रमाला मोलाचे सहकार्य लाभले.

**दि. १९ जाने २००८ :** शुश्रुषा अपंग संस्था, अंबरनाथ च्यावतीने रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेली अपंगांचे पहिले वहिले रायगड गिर्यारोहण मोहिम कडाक्याच्या थंडीत यशस्विरित्या पार पडली. या मोहिमेत गिर्यारोहणाबरोबर रॅपलिंगही घेण्यात आले. एकूण ७५ अपंगांनी भाग घेतला. अभियानचे, मुंबई महानगरपालिका नागरी पुरस्कार सन्मानित अनुभवी अपंग गिर्यारोहक श्री. अनिल चाळके यांनी अवघ्या पावणे तीन तासात कुठेही पाणी न पिता आणि कुठेही आराम न करता रायगड गिर्यारोहण पूर्ण केले, तसेच रॅपलिंगही केले.

**दि. २७ जाने. २००८ :** मोफत आरोग्य तपासणी औषध वाटप शिबीर - स्थळ : अवसरे गाव, नेरळ, पिनॅकल क्लब, क्रांतीवीर भगत मास्टर प्रतिष्ठान, नेरळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी आणि औषध वाटर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा एकूण २५१ रुग्णांनी लाभ घेतला. डॉ. शैलेश भाटीया, डॉ. हिना भाटीया, डॉ. जयेश कटीरा, डॉ. विनय जेजूरीकर यांनी रुग्णांना तपासून एक महिना पुरेल इतके औषध दिले.

**पदभ्रमण मोहिम, गडकिल्ल्यांवर भटकंती -** युवा अभियान आणि पिनॅकल क्लबतर्फे तरुणांमध्ये साहसी वृत्ती रुजावी, तसेच गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यासाठी सातत्याने गडकिल्ल्यांवर भटकंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. भामचंद्रगड, अवचितगड, घोसाळगड, भिरवाडीचा किल्ला, सोनगिरी, भूपतगड, राजगड तसेच कान्हेरी गुंफा येथे रॅपलिंगचे प्रशिक्षण या सर्व कार्यक्रमाचा लाभ एकूण १६९ गिर्यारोहकांनी घेतला.

**'टकमक' टोकावरून १००० फूट प्रस्तरावतरण (रॅपलिंग) -** किल्ले रायगडावरील टकमक टोकावरून १००० फूट रॅपलिंगचा कार्यक्रम दि. २१ ते २५ डिसें. २००७ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. ६ ते ६८ वयोगटाच्या एकूण १४१ गिर्यारोहकांनी याचा लाभ घेतला. यशस्वी गिर्यारोहकांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. दि. ५ जाने. रोजी दादर येथे झालेल्या या कार्यक्रमाला मा. श्री. ए. पी. रघुवंशी, पोलिस उपमहासंचालक, लोहमार्ग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**साहसी मोटर सायकल मोहिम -** सदर मोहिम अष्टविनायक आणि अकरा मारुती या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. श्री समर्थ स्थापित चाफळ, उंब्रज, शिंगणवाडी, माजगाव, बत्तीस शिराळे, मनपाडले, पारगाव, बहे, शहापूर आणि मसूर येथील मारुती मंदिरांना भेटी देण्यात आल्या.

वरील सर्व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. विनायक वेंगुर्लेकर, श्री. सचिन आयरे, श्री. संतोष कल्याणपूर, श्री. राजेश परळीकर, श्री. विजय शहा, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. सुरेश पाटील, इत्यादींनी मेहनत घेतली.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन साहित्य स्पर्धा २००७

## काव्यलेखन स्पर्धेचा निकाल

### परीक्षक : मा. दिलीप पांढरपट्टे

| अनु. क्र. | क्रमांक | नाव व कवितेचे नाव | कॉलेजचा पत्ता |
|---|---|---|---|
| १. | प्रथम | गीतांजली रामराव शिंदे<br>"तिची अनामत" | शिक्षणशास्त्र महाविद्यालय संलग्न, अध्यापक विद्यालय, एम. व्ही. पी. कॅम्पस, गंगापूर रोड, नाशिक |
| २. | द्वितीय | शिल्पा बाळासाहेब जाधव<br>"नियती" | के. जे. सोमैया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोहनीराजनगर, कोपरगाव, जि. अहमदनगर |
| ३. | तृतीय | दिपिका अंबादास देवरे<br>"अतिवृष्टी" | शिक्षणशास्त्र महाविद्यालय संलग्न, अध्यापक विद्यालय, एम. व्ही. पी. कॅम्पस, गंगापूर रोड, नाशिक |
| ४. | उत्तेजनार्थ | समता म. रानडे<br>"नात" | दि. ग. वझे महाविद्यालय, मुलुंड (पू.), मुंबई |
| ५. | उत्तेजनार्थ | चंद्रकला क्षीरसागर<br>"कविता" | संगमनेर कॉलेज, संगमनेर, जि. अहमदनगर |
| ६. | उत्तेजनार्थ | चंद्रकला क्षीरसागर<br>"भेट" | संगमनेर कॉलेज, संगमनेर, जि. अहमदनगर |

# कथालेखन स्पर्धेचा निकाल

## परीक्षक : मा. जयदेवी स्वामी

| अनु. क्र. | क्रमांक | नाव व कवितेचे नाव | कॉलेजचा पत्ता |
|---|---|---|---|
| १. | **प्रथम** | उमेश लक्ष्मण देशमुख<br>**"फेरा"** | क्रांतीसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवे,<br>ता. वाळवा, जि. सांगली |
| २. | **द्वितीय** | मयुरा युवराज देशमुख<br>**"एक घुसमट"** | राजर्षी शाहू महाविद्यालय,<br>लातूर |
| ३. | **तृतीय** | श्वेता चंद्रकांत बोरसे<br>**"शोधा म्हणजे सापडेल"** | शिक्षणशास्त्र महाविद्यालय संलग्न,<br>अध्यापक विद्यालय, एम. व्ही. पी. कॅम्पस,<br>गंगापूर रोड, नाशिक |
| ४. | **उत्तेजनार्थ** | पल्लवी भिकन पाटील<br>**"लिलावातील बैल"** | महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित,<br>कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय,<br>चोपडा, जि. जळगाव |
| ५. | **उत्तेजनार्थ** | मिलिंद प्रभाकर मोरे<br>**"झुंज"** | प्रताप कॉलेज, अंमळनेर, जि. जळगाव |
| ६. | **उत्तेजनार्थ** | अंजली भिकाजी पाटील<br>**"इस्कोट"** | पीव्हीजी कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड सायन्स, २०६,<br>दिंडोरी रोड, मेरी जवळ, नाशिक |

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे दिले जाणारे राज्यस्तरीय
## यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार प्राप्त विजेते

| अनु.क्र. | सन | नाव | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | १९९८ | १. श्रीमती उल्का महाजन<br>२. श्री. सारंग पांडे | १. रायगड<br>२. अहमदनगर |
| २. | १९९९ | १. श्रीमती अनिता पगारे<br>२. श्री. विजय कान्हेकर | १. नाशिक<br>२. परभणी |
| ३. | २००० | १. श्रीमती मनिषा तोकले<br>२. श्री. हरीष सदानी | १. बीड<br>२. मुंबई |
| ४. | २००१ | १. श्रीमती प्रतिभा शिंदे<br>२. श्री. विलास लोंढे | १. नंदूरबार<br>२. पुणे |
| ५. | २००२ | १. श्रीमती सविता जाधव<br>२. श्री. शाहिन शेख | १. पुणे<br>२. सांगली |
| ६. | २००३ | १. श्रीमती अंजली काटे<br>२. श्री. अविनाश पाटील | १. पुणे<br>२. धुळे |
| ७. | २००४ | १. श्रीमती वैशाली पाटील<br>२. श्री. विश्वास ठाकुर | १. रायगड<br>२. नाशिक |
| ८. | २००५ | १. डॉ. उषादेवी पाटील<br>२. श्री. प्रफुल्ल कुकडे | १. इस्लामपूर/सांगली<br>२. अमरावती |
| ९. | २००६ | १. श्रीमती कुषावर्ता बेले<br>२. श्री. अभिजित वडगावकर | १. लातूर<br>२. सोलापूर |
| १०. | २००७ | १. श्रीमती वैशाली शिंदे<br>२. श्री. हेरंब कुलकर्णी | १. कराड, सांगली<br>२. अहमदनगर |

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

## ★ कार्यवृत्त ★

बदलत्या अर्थव्यवस्थेत, समाजव्यवस्थेत कुटुंबव्यवस्थाही झपाट्याने बदलत चालली आहे. नवीन समस्यांची भर पडत आहे आणि या पार्श्वभूमीवर प्रामुख्याने स्त्रियांवरचा ताण-तणाव आणखीन वाढतो आहे. यासाठी किशोरवयीन मुलींपासून वृद्ध स्त्रियांपर्यंत सर्वांनाच मार्गदर्शनाची, प्रोत्साहनाची, धीर देण्याची, समजाऊन सांगण्याची तसेच समोर ठाकणाऱ्या समस्यांना समोरे जाण्याची क्लुप्ती सांगण्याची खूप गरज आहे. हे सगळे लक्षात घेऊनच महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या कार्याची वाटचाल होते आहे. सर्व थरातील महिलांसाठी काम करता यावे यासाठी संयोजिका रेखा नार्वेकर प्रयत्न करीत असतात. त्यांची पूर्णवेळ सहकारी शोभा लोंढे यांचे सहकार्य घेऊन अनेक महिला व महिलासंस्था यांच्या माध्यमातून विविध कार्यक्रम, उपक्रम आयोजित केले जातात.

दिनांक १८ ऑक्टोबर २००७ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आणि मुंबई सहकारी बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने चेंबूर येथील बचत गटातील ७० महिलांसाठी महिला अल्पमुदत प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी महिलांना टोमॅटोसॉस बनवण्याचे त्याचप्रमाणे मेणबत्त्या तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन करण्यात आले.

दिनांक २०,२३, २९ ऑक्टोबर रोजी 'समता महिला बचत गट', 'महाराष्ट्र महिला बचत गट' 'सावित्रीबाई फुले बचत गट' येथील महिलांची भेट घेऊन त्यांना हिशेब कसा लिहावा यासंबंधी शोभा लोंढे यांनी समजाऊन सांगितले.

दिनांक १, २, ३,८ नोव्हेंबर रोजी कुलाबा विभागातील शिवशक्तीनगर, गणेशमूर्तीनगर येथील महिलांची बैठक घेऊन त्यांना कुटीरउद्योगाचे महत्त्व समजाऊन सांगण्यात आले.

दिनांक १२, १४, २२, २३ नोव्हेंबर रोजी मुलुंड-नाहूर गांव येथील महिलांचे बचत गट, वांद्रे येथील महालक्ष्मी व सिद्धीविनायक बचत गट येथील महिलांना बचतगटाच्या व्यवस्थापनाविषयी व्यासपीठाच्यावतीने मार्गदर्शन करण्यात आले.

दिनांक १८ डिसेंबर व १९ डिसेंबर २००७ रोजी वांद्रे येथील बचत गटातील ६० महिलांसाठी 'लघुउद्योग प्रशिक्षण कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. यावेळी श्री. एस. एस. गडदे, श्री. भाऊसाहेब पार्ले, श्री. डी. एस. निकम यांनी महिलांना मार्गदर्शन केले व सहकारातून औद्योगिक क्षेत्राचा विकास आतापर्यंत कसा घडून आला हे व्याख्यानातून सांगितले. कु. दिप्ती पवार आणि श्री. प्रकाश मोहिले यांनी मेणबत्ती, अगरबत्ती, टोमॅटो सॉस, अत्तर, फिनेल बनविण्याचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकाद्वारे दिले. यावेळी महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या संयोजक रेखा नार्वेकर यांनी महिलांना संघटीत होऊन आर्थिक बाबतीत सक्षम होण्यासाठी आवाहन केले. मुंबई सहकारी बोर्डाच्या संचालिका शालिनी गायकवाड यांनीही आपले अनुभव उपस्थितांना सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला व्यासपीठाच्या कार्यकर्त्या वासंती शेवाळे यांनी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शोभा लोंढे यांनी सर्वांचे आभार मानले.

२४, २७, २९ डिसेंबर २००७ रोजी गांधीनगर मुलुंड, हनुमान नगर-भांडूप, सावित्रीबाई फुले महिला मंडळ - भांडुप येथील महिलांना कुटीरउद्योग व लघुउद्योगाचे महत्त्व समजाऊन देण्यात आले.

३१ डिसेंबर २००७ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्यावतीने मुलुंड-रायगड येथे व्यवसाय मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी ७० महिला उपस्थित होत्या. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व मुंबई सहकारी बोर्डाच्या सहयोगाने कार्यशाळा

उत्तमरित्या संपन्न झाली.

३ जाने २००८ रोजी थोर समाजकार्यकर्त्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवशक्तिनगर-कुलाबा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सावित्रीबाईंवर रचलेल्या ओव्या तसेच स्त्रीशिक्षणासाठी त्यांनी केलेले अविरत प्रयत्न याचाही मागोवा घेण्यात आला. शोभा लोंढे, लिंबाबाई बोटे, चंदना कांबळे या सर्वांचे चांगले सहकार्य मिळाले.

४ जाने. २००८ रोजी मुलुंड येथील 'अल्ली बहादूर चाळेतील महिलांनी सावित्रीबाई फुले जयंती साजरी केली. महिला व्यासपीठाच्या श्रीमती रतन गोडांबे यांनी शासकीय योजनांविषयी यावेळी महिलांना माहिती दिली. संयोजक रेखा नार्वेकर यांनी ४ जाने. २००८ रोजी रत्नागिरीतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजाभाऊ लिमये, तसेच समन्वयक श्रीमती प्राची शिंदे यांच्याशी महिलांच्या पुढील कार्यक्रमांविषयी चर्चा केली.

७,९,११,१४,१५ जानेवारी २००८ रोजी कुर्ला, भांडुप, नाहूर गांव मुलुंड, अंबरनाथ, वांद्रे येथील बचतगटाना मार्गदर्शन करण्यात आले.

२७ जानेवारी २००८ रोजी श्री. नारायणराव आचार्य विद्यानिकेतन, चेंबूर येथील नववीतील ७५ किशोरवयीन मुलींसाठी 'स्वपरिचय व सामाजिक भान आणि स्वसंरक्षण' या संदर्भात जाणीव जागृती होण्यासाठी एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत संयोजक रेखा नार्वेकर यांनी सध्या सोप्या पद्धतीने प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मुलींना समजा म्हणजे काय? माणूस कसा घडतो, संपूर्ण समाजाचे आरोग्य सदृढ रहाण्यासाठी बालके, किशोरवयीन मुले-मुली, युवक-युवती, स्त्री-पुरुष आणि ज्येष्ठ नागरिक (वृद्ध माणसे) या सगळ्यांचे शारिरीक व मानसिक संतुलन समर्थ असणे आवश्यक असल्याचे सांगितले. विश्वस्त श्री. पाटील, मुख्याध्यापक श्री. सोनावणे, शिक्षिका वैद्यबाई व काळेबाई या सर्वांचेच सहकार्य लाभले. शोभा लोंढे यांनी मुलींकडून स्त्रीचं महत्त्व सांगणारी गाणी म्हणून घेतली.

३० जानेवारी २००८ रोजी अखिल भारतीय महिला परिषद, दादर माटुंगा शाखेच्या संयुक्त विद्यमाने 'उत्तुंग भरारी' कार्यक्रम मालिकेतील दुसऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मॉड्युलर किचनच्या उद्योजिका साठचे, साड्या व स्त्रियांचे विविध पोषाख तयार करणाऱ्या अनिता संझगिरी, निरनिराळ्या डिझाईन्सच्या बॅग्ज व पर्सेस बनवणाऱ्या सुचेता मुंडे तसेच ग्रिटिंग्ज व भेटवस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उन्नती पारेख यांच्याशी महाराष्ट्र महिला व्यासपीठ संयोजिक रेखा नार्वेकर यांनी संवाद साधला. उद्योगव्यवसाय करताना येणाऱ्या अडचणींशी सामना करून इंग्लंड-अमेरिकेत निर्यात करण्यापर्यंत मजल गाठणाऱ्या या कर्तबगार महिलांचा गौरव करण्यात आला. अखिल भारतीय महिला परिषदेच्या सभागृहात प्रचंड महिलांच्या उपस्थितीत 'उत्तुंग भरारी' कार्यक्रम संपन्न झाला. आर्थिक बाबतीत स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न, मेहनत, चिकाटी, धैर्य याचबरोबर दूरदृष्टी आणि समोरच्या व्यक्तीला ओळखण्याची क्षमता असणे खूप आवश्यक असल्याचे यावेळी महिलांना निदर्शनास आले. मार्गदर्शनाबरोबरच प्रोत्साहनाचे बळ घेऊन इथे आलेली प्रत्येक युवती व महिला स्वतःमधला आत्मविश्वास जागवित होती. शेवटी सेवाभरतीच्या अध्यक्षा श्रीमती सुलक्षणा निमगांवकर यांनी सर्वांना धन्यवाद दिले. उद्योजिकांनी प्रदर्शनात ठेवलेल्या वस्तूंची खरेदी करता करता भगिनींनी ,एकमेकींचा निरोप घेतला.

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या माध्यमातून विविध कार्यक्रम उपक्रमांच्याद्वारे महिला प्रबोधनाबरोबर आरोग्य, शिक्षण, कायदेविषयक, आर्थिकबाबतीत साक्षरता प्रस्थापित करण्यासाठीचा प्रयत्न केला जातो. फेब्रुवारी महिन्यात कामगार वस्तीतील स्त्रियांसाठी कायदे विषयक कार्यशाळा घेण्यात येईल. 'उत्तुंग भरारी' कार्यक्रमांतर्गत साहित्या क्षेत्रातील प्रतिभावंत स्त्रियांशी सुसंवाद साधण्यात येईल. त्याचप्रमाणे किशोरवयीन मुलींसाठी 'जाणीव जागृती' शिबिराचे आयोजन केले जाईल. ग्रामीण भागातील महिलासंस्थाशी संपर्क साधून एक नेटवर्क उभारून सहयोगाने कार्य करण्यासाठी संस्थाप्रमुखांची एक बैठक घेतली जाईल.

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम

## ★ कार्यवृत्त ★

१९८७च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम नावाच्या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली निस्वार्थ सेवा या योजनेसाठी देत आहेत.

**वरील विभागामार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते.**

१. समाजातील गोर-गरिब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नासंबंधी सखोल अभ्यास करून गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

३. काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

४. पक्षकारांच्या तंट्यामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.

५. संबंधित न्यायालयाच्या सहकाऱ्याने लोक न्यायालयाचे आयोजन करणे.

६. विधी विषयामध्ये संशोधन करून प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करून वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

७. कायद्यांची विशेष माहिती करून देण्यासाठी तज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करून देण्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.

९ विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे.

त्यानुसार गेल्या चार महिन्यामध्ये म्हणजेच १ ऑक्टोबर २००७ ते ३१ जानेवारी, २००८ या अवधीमध्ये फोरमकडून करण्यात आलेल्या कामाचा आढावा खालीलप्रमाणे आहे.

१) **फोरमच्या बैठका :** योजनेच्या अंमलबंजावणीबाबत विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. त्यानुसार गेल्या चार महिन्यामध्ये दिनांक १) १२ ऑक्टोबर २००७ २) १६ नोव्हेंबर २००७ ३) १४ डिसेंबर २००७ व ४) १७ जानेवारी २००८ रोजी फोरमच्या चार बैठका झाल्या.

२) **उपसमितींच्या बैठका :** एकाद्या विषयासंबंधी सखोल अभ्यास करून प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी वेगवेगळ्या समित्या नेमल्या जातात. 'ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा २००७ च्या आयोजनाबाबत विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागांची सुकाणू समिती आणि ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधीचा समिती यांच्या अनेक बैठका झाल्या.

**छाननी समिती :** रयत शिक्षण संस्थेचे पंचरत्न अध्यापक विद्यालय,

पिरकोन, (तालुका - उरण, जिल्हा- रायगड) येथील विद्यार्थीनींनी लिहिलेल्या निबंधाची छाननी समितीची बैठक झाली.

३) **कायदेविषयक सल्ला केंद्र :** गोरगरिब व सामान्य लोकांन कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळात प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या चार महिन्या या केंद्राच्या १७ बैठका झाल्या. या अवधीमध्ये ७० लोकांनी या केंद्राचा लाभ घेतला.

४) **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र :** दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळात समुपदेशन व तडजोड केंद्राचे आयोजन करण्यात येते.

५) **आपल्या कायद्याची माहिती करून घ्या (Know your Law Lecture Series):** या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदेपडितांचे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

६) **विधी साक्षरता कार्यशाळा :** लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करून देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्थ, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी. गेल्या चार महिन्यामध्ये या सर्व घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यांचा तपशील खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

(६-१) फोरम व फेस्कॉम ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १४ ऑक्टोबर २००७ रोजी मीनाताई ठाकरे उद्यान, महाकाली गुंफा, अंधेरी (पूर्व) येथे ज्येष्ठ नागरिकासाठी एका विधी कार्यशाळेंचे आयोजन करण्यात आले. श्री. एम. एस. कुलकर्णी हे अध्यक्ष स्थानी होते. मा. सुरेश शेट्टी, महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. १०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते.

(६-२) फोरम व कुळगाव-बदलापूर, अपंग विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १२ नोव्हेंबर २००७ रोजी नीळकंठेश्वर सभागृह, बदलापूर येथे अपंग लोकांसाठी एका खास विधी शाक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. श्री. नंदकिशोर पातकर, अध्यक्ष बदलापूर नगरपालिका हे अध्यक्षस्थानी होते. १०० पेक्षा जास्त अपंग स्त्री-पुरुष उपस्थित होते. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते.

(६-३) फोरम व संकल्प प्रतिष्ठान, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ९ डिसेंबर २००७ रोजी कॉंग्रेस भवन उद्यान, पालघर येथे सामान्य स्त्री-पुरुषांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पालघर वकील संघाचे अध्यक्ष श्री. जे. एम. त्रिवेदी हे अध्यक्षस्थानी होते. १०० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते.

(६-४) फोरम व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पिरकोन, यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १६ डिसेंबर २००७ रोजी त्या महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये त्या महाविद्यालयाच्या व पंचरत्न अद्यापक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी एका विधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुले व मुली) उपस्थित होते. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते.

(६-५) फोरम व डॉ. डि. वाय. पाटील तंत्रनिकेतन, नेरुळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १२ जानेवारी २००८ रोजी त्या

तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांसाठी नेरुळ येथील डॉ. डि. वाय. पाटील हॉस्पिटलच्या सभागृहामध्ये एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते प्राचार्य डॉ. पाठक हे अध्यक्षस्थानी होते. नवी मुंबईचे पोलिस आयुक्त श्री. रामराव वाघ हे प्रमुख पाहुणे होते. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते.

(६-६) फोरम व जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली तालुका-कल्याण, जिल्हा ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २७ जानेवारी २००८ रोजी त्या महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये खास महिलांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातून आलेल्या १०० पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या. प्राचार्य श्री. एन. डी. भोंडीवले हे अध्यक्षस्थानी होते. व्याख्यांनाचे माध्यम मराठी होते.

(६-७) **शपथ कार्यक्रम** : वर दर्शविलेल्या सर्व विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये हुंडाबंदीसंबंधी शपथ घेण्यात आल्या. तसेच संविधानातील मूलभत कर्तव्यपालनासंबंधी शपथा घेण्यात आल्या. त्याचप्रमाणे संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात आले.

७. **निबंधांना बक्षिसे** : विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयाबाबत निबंध लिहिता येतील. गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात. दिनांक १६ डिसेंबर २००७ रोजी झालेल्या कार्यशाळेबाबत पिरकोन महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांना वरील अशी बक्षिसे देण्यात आली.

८. **विधी साक्षरता कार्यशाळेची प्रशंसा** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानकडून आयोजण्यात आलेले वरील सर्व विधी साक्षरता कार्यक्रम यशस्वी झाले आहेत. प्रत्येक जण या कार्यक्रमाची प्रशंसा करीत आहेत. अशा कार्यक्रमामध्ये भाग घेतलेल्या लोकांनी तर तोंड भरून प्रशंसा केली आहे. असे कार्यक्रम खेडोपाडीसुद्धा घेऊन जावेत अशी इच्छा लोक व्यक्त करीत आहेत.

९. **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा २००७** : दरवर्षीप्रमाणे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे रविवार दिनांक ७ ऑक्टोबर २००७ रोजी चव्हाण केंद्राच्या प्रमुख सभागृहामध्ये मा. श्री. शरद काळे यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिकांचा आठवा आनंद मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाला डॉ. अरुण टिकेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वांद्रे ते डहाणू या भागामध्ये कार्यरत असलेल्या अंदाजे ३० ज्येष्ठ नागरिक संघानी या कार्यक्रमामध्ये भाग घेतला. समारंभाला अंदाजे ४०० ज्येष्ठ नागरिक प्रतिनिधी उपस्थित होते. या संमारंभामध्ये अंधेरीच्या श्रीमती सुदर्शन छड्डा, गोरेगावच्या श्रीमती मनोरमा मित्तल, विलेपार्लेचे श्री. गजानन जोशी आणि उत्तनचे श्री. ऑगस्टिन कोळी यांचा कर्तबगार ज्येष्ठ नागरिक म्हणून सत्कार करण्यात आला. समारंभाच्या सुरुवातीलाच श्री. विघ्नेश जोशी यांचा गायनाचा कार्यक्रम झाला.

१० **संशोधनाचे काम** : फोरमतर्फे विधी संशोधनाचे कामसुद्धा केले जाते. सध्या महाराष्ट्र हुंडाबंदी नियम २००३ यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी संशोधन चालू आहे.

११. **आगामी कार्यक्रम** : राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांसाठी खास विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यासंबंधी प्रस्ताव विचाराधीन आहे.

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय

## ★ कार्यवृत्त ★

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाच्या उद्दीष्टाप्रमाणे समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास, कायदा, वर्षांक, चरित्र, आत्मचरित्र, धर्मकोश, विश्वकोश, भारतीय संस्कृतीकोश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, मराठी विश्वकोश, मराठी विश्वचरीत्र कोश, ॲटलास इत्यादी विषयावरील पुस्तकांचा संग्रह ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच संबंधित विषयाला अनुसरुन नविन पुस्तके ग्रंथालयामध्ये घेण्यात येतात तसेच मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जीवनाच्या विविध पैलूचे दर्शन घडविणारी पुस्तके ही ग्रंथालयामध्ये आहेत.

सार्वजनिक दृष्टचा महत्त्वाचे विषय असलेले आणि संदर्भाकरीता उपयोग व्हावा या दृष्टीने ग्रंथालयांनी काही महत्त्वाच्या विषयसंबंधीची वृत्तपत्रीय कात्रणे काढून, वाचकांना हाताळता यावी यासाठी व्यवस्थित बांधणी करून ग्रंथालयामध्ये संदर्भाकरीता ठेवली आहेत.

विद्यार्थी, संशोधक यांच्याकरीता अद्ययावत माहितीसाठी नियतकालिकाचा उपयोग होतो. नियतकालिकामधून प्रसिद्ध होणारे अनेक विषयावरील लेख अभ्यासकांना उपयोगी पडतात. याकरीता ग्रंथालयीन महत्त्वाच्या नियतकालिकेची बांधणी करून संदर्भाकरीता ठेवली आहे.

ग्रंथालयाचा जास्तीत जास्त सुलभतेने वापर व्हावा यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. याकरीता ग्रंथालयांनी पुस्तकांची यादी अद्ययावत ठेवण्याकरीता संगणकीकरण केले आहे. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रंथालय व्यवस्थापनात अनेक बदल होत आहेत. ग्रंथालयाच्या अंतर्गत कामासाठी आणि सेवेसाठी तांत्रिक उपकरणाचा वापर करण्यात येत आहे. ग्रंथालय सॉफ्टवेअरच्या मदतीने ग्रंथालयाचे संगणकीकरण पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये असलेली पुस्तके आणि नव्याने खरेदी करण्यात येणारी पुस्तके वाचकांना सहज उपलब्ध व्हावी याकरीता OPAC-On public Access Catalogue चा उपक्रम ग्रंथालयानी वाचकांच्या माहिती सेवेसाठी सुरू करण्याचे ठरविले आहे. यामध्ये लेखक, ग्रंथनाम, प्रकाशन, विषय, वषा वर्गांक यांचा वापर करून संगणकांच्या आणि OPAC च्या मदतीने वाचकांना माहिती मिळविता येतील.

यशवंतराव चव्हाण ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथालय असून सभासदानी संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करायचा आहे. या व्यतिरिक्त बाकी ग्रंथ अमानत रक्कम जमा करून घरी वाचण्याकरीता सभासद ग्रंथाचा लाभ घेऊ शकतो.

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे आयोजन व व्यवस्थापन यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले आहे. ग्रंथालय व्यवस्थापनाचे काम श्री. अनिल पु. पाझारे करतात. श्री. वा. रा. कामत हे सल्लागार म्हणून काम पहातात तसेच सौ. प्रियंका देसाई आणि श्री. अनिल चिंदरकर सहकार्य करतात.

# सृजन कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाकरता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सृजनच्या माध्यमातून समाजातील मान्यवर व्यक्तींच्या सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना आणि संयोजन मा. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सन्मानीय सल्लागार म्हणून सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डगल्स जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग हे काम पहातात. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सृजन कार्यशाळा ९.०० वाजता चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात येते. श्री. विद्याधर खंडे त्यांना सहाय्य करतात.

**दि. ऑक्टो. २००७ :** रोजी जे. जे. स्कूल ऑफ आर्टसच्या श्रीमती स्वाती गांगण आणि सहकाऱ्यांनी मुलांना मातीकाम (Pottery) विषयी माहिती दिली. यामध्ये मुलांनी मातीचे विविध आकारांचे मुखवटे व नंतर चाकाच्या साहाय्याने पणती तसेच इतर भांडी बनवली.

**दि. नोव्हें. २००७ :** मुंबई फायरब्रिगेडचे श्री. योगेश पी. शेलार (Assistant Station Office) यांनी सृजनच्या विद्यार्थ्यांना एरियल लोडेर प्लॅटफॉर्म याच्यावर विद्यार्थ्यांना सफर घडवून आणली त्याचबरोबर त्याचा उपयोग मुलांना समजवून सांगितला.

कार्यशाळेमध्ये फायरब्रिगेडचा फोन आल्यानंतर वेगवेगळ्या लाईटच्या साहाय्याने प्रत्येक गाडी सर्व तयारीनिशी दोन तीन मिनिटात फायरस्टेशनच्या बाहेर पडते व तातडीने घटना स्थळी पोहचून मदत कार्यास सुरुवात करतात आगीच्या प्रसंगी उद्‌भवणाऱ्या वेगवेगळ्या घटनांची प्रात्यक्षिके दाखविली त्यामध्ये ॲम्ब्युलन्स सेवा, प्राण्यांची सुटका, आगीचे विविध प्रकार व त्यावर प्रतिबंध करण्याचे प्रकार इ. माहिती देण्यात आली.

**डिसें. २००७ :** शिल्पा संगीत विद्यालय, डोंबिवली येथील विद्यार्थ्यांचा शास्त्रीय संगिताचा कार्यक्रम चव्हाण सेंटर येथे घेण्यात आला होता.

**दि. ८ जाने. २००८ :** नवीन वर्षातील कार्यक्रमाची सुरुवात.

---

'नियती प्रत्येक माणसाला आठवणींचा एक भरघोस गुच्छ देऊन त्याचा सत्कार करीत असते. अर्थात ज्याच्या त्याच्या कर्तृत्वाप्रमाणे त्या गुच्छातील फुले विविध प्रकारची असतात. माझ्या वाटयाला आलेल्या आठवणींच्या गुच्छातील फुले सर्व प्रकारची आहेत. त्यांत मनाला कर्तव्यपूर्तीचे समाधान देणारी फुले जशी आहेत, तशी असंख्य चांगल्या माणसांच्या सहवासाचा सुगंध देणारीही आहेत. काही कडवट व उग्र वासाची फुले आहेत, तर काही फुलांवर अश्रुचे दवबिंदु अजूनही सुकलेले नाहीत. काही फुले अस्वस्थता निर्माण करतात, तर काही निर्भेळ आनंद देतात. एकंदरीत नियतीने दिलेला माझ्या आठणींचा गुच्छ समृद्ध आहे - आकर्षक आहे, कधी न सुकणारा आहे, हे माझ्या आयुष्यातील एक फार मोलाचे धन आहे.

- स्व. यशवंतराव चव्हाण

# विभागीय केंद्र, कोकण

## ★ कार्यवृत्त ★

दि. २५, २६, २७ जाने. ०८ या कालावधीत संपन्न झालेल्या आर्ट सर्कल थिबा राजवाडा कला महोत्सवाचे कार्यकर्माचा थोडक्यात वृत्तांत

रत्नागिरीतील कला रसिकांना सर्व क्षेत्रातील उदा. संगीत कला, चित्रकला, शिल्पकला, काष्ठशिल्पकला, छायाचित्रण कला, वगैरे सर्वांगीण कलांचा आस्वाद, मेजवानी, नागरिकांना देण्याचे तसेच होतकरू कलाकारांना उत्तेजन देण्याचे काम थिबा राजवाडा कला महोत्सवाच्या निमित्ताने ''आर्ट सर्कल'' रत्नागिरीने उपलब्ध करून दिले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कोकण विभागीय केंद्र, रत्नागिरी तसेच जिल्हा समिती, फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांचे प्रायोजकत्व या कार्यक्रमास लाभले. दि. २५, २६ व २७ जाने. २००८ या कालावधीत रत्नागिरीच्या सांस्कृतिक इतिहासात या महोत्सवाने ''सोनेरी पान'' लिहिले गेले आहे.

पारतंत्र्यात असताना ब्रिटीशांनी ब्रह्मदेशाचा राजा थिबा याला रत्नागिरी येथे ज्या राजवाड्यात डांबून ठेवले. तो इतिहास प्रसिद्ध थिबा राजवाडा या महोत्सवाने सगल तीन दिवस उजळून निघाला. हे एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ आहे. ''आर्ट सर्कल'' रत्नागिरीने आयोजित केलेल्या ह्या महोत्सवाचे उद्घाटन दि. २५ जानेवारी २००८ रोजी सायंकाळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कोकण विभागीय उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, आमदार श्री. उदय सामंत आणि रत्नागिरी जिल्हा समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी केले. उद्घाटनाच्या दिवशीची सायंकाळ श्री. निनाद मूळगावकर यांच्या बासरी वादनाने व सुप्रसिद्ध गायिका श्रीमती मालिनी राजूरकर यांच्या गायनाने रंगली दि. २६ जानेवारी २००८ च्या प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांचे हस्ते कला जत्रेचे उद्घाटन झाले. चित्रकला, छायाचित्रण, रांगोळी, काष्ठशिल्प, मूर्तीकला आणि वाळूशिल्प आदी कलांचा महोत्सवाच्या निमित्ताने रसिकांनी दोन दिवस आनंद लुटला. चित्रकार अरुण दाभोळकर, विशाल वाडिये, सुमन वाडिये, छायाचित्रकार श्रीकांत मलुष्टे, व्यंगचित्रकार श्रीनिवास प्रभुदेसाई, चित्रखार संजय शेलार आदींच्या प्रत्यक्ष सादरीकरणाने रसिकांना मोहिनी घातली. रत्नागिरी शहर व आजूबाजूच्या परिसरातील जवळ जवळ तीन हजार रसिकांनी प्रदर्शन पाहून आनंद व्यक्त केला व दरवर्षी असा कार्यक्रम सादर करावा अशा अपेक्षा पालकमंत्र्यांपासून सर्वांनीच व्यक्त केल्या. सुगम संगीत कार्यशाळेत रत्नागिरीतील लहान-मोठे गायक मंडळी व कवींना श्री. कौशल इनामदार यांचे मार्गदर्शन लाभले. हस्तकौशल्यातून हुबेहूब भाव

साकारणारे मूर्तीकार संदीप बारटक्के, पाण्यावर स्व. यशवंतराव चव्हाण यांची हुबेहुब भाव साकारणारे मुंबईचे प्रशांत मयेकर, तसेच अनेक रांगोळ्यांद्वारे कलाकृती जिवंत करणारे अनेक कलाकार यांच्या रांगोळया लक्ष वेधून घेणाऱ्या ठरल्या. चाकावर मातीच्या वस्तू बनवायला शिकविणारे श्री. महेंद्र ढवळे यांनी बाळ गोपाळांप्रमाणेच मोठ्यांनाही मूर्तीकामाचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. मूक-बधिर विद्यालयातील मुलांनी बनविलेले वाळूशिल्प हे या महोत्सवाचे आकर्षण ठरले. तसेच त्यांनी बनविलेल्या वस्तूंच्या स्टॉललाही उत्तम प्रतिसाद मिळाला. कै. गोपाळराव देऊस्कर, मूळगावकर आदी महान कलाकारांच्या चित्राबरोबर अनेक प्रतिभावान चित्रकाराची चित्रे या निमित्ताने रत्नागिरीकरांना पाहता आली. राजवाडयासमोर कला मंचावर बासरी वादक निनाद मुळगांवकर, संतूर वादक पं. उल्हास बापट, ज्येष्ठ गायिका मालिनी राजूरकर, कलापिणी कोमकली तसेच रत्नागिरीचे श्री. प्रसाद गुळवणी, सौ. मृणाल परांजपे यांच्या गायनाचा आनंद येथील रसिकांनी प्रथमच अनुभवला. रत्नागिरीतील वकील, डॉक्टर, अधिकारी संगीतप्रेमी प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या संगीत कला महोत्सवात आमंत्रित केलेले महान कलाकार पाहता तिच्या उभारण्यापासून तीनही दिवसांच्या कार्यक्रमांचे यथायोग्य आयोजन करणे हे ''आर्ट सर्कल''ने टाकलेले धाडसाचे पाऊल होते असे म्हणावे लागेल. या महोत्सवाच्या निमित्ताने रत्नागिरीच्या सांस्कृतिक, सांगितीक, कला - रांगोळी चळवळीला एक सुंदर रूप प्राप्त झाले. निधी संकलनासाठी ''आर्ट सर्कल''ने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानकडे रक्कम रु. ३,००,०००/- ची मागणी केली होती. आर्ट सर्कलचे एकूण कार्यक्रमाचे बजेट हे रक्कम रु. आठ लाखाचे होते. त्या मानाने एक सामाजिक बांधिलकी म्हणून प्रतिष्ठानने प्रायोजकत्व म्हणून विभागीय स्तरावर चर्चा करून रक्कम रु. १,००,०००/- ची देणगी आर्ट-सर्कलला दिली. एकंदरीत कार्यक्रमाची भव्यता पाहता प्रतिष्ठानने दिलेली ही देणगी योग्य असून सुप्रसिद्ध गायिका कलापिणी कोमकली, संतूर वादक पं. उल्हास बापट व चित्रकार अरूण दाभोळकर अशा महान कलाकारांच्या कलेचा आस्वाद रत्नागिरीकरांना घेता आला. त्याबद्दल प्रतिष्ठानलाही धन्यवाद मिळत आहेत. आर्ट सर्कलने स्वागत कक्षात कमान तसेच व्यासपीठ आणि प्रांगणात ठिकठिकाणी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कोकण विभागीय केंद्र, रत्नागिरी जिल्हा समितीचे फलक ठळकपणे प्रदर्शित केले होते. जिल्ह्याच्या ठिकाणचा आर्ट सर्कलचा हा कार्यक्रम भव्य दिव्य आणि विविध प्रदर्शने, संगीत आदी कार्यक्रमांनी रत्नागिरीकरांची मने जिंकणारा ठरला. त्यामुळे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या जिल्हा समितीने केलेले आर्थिक सहाय्य निश्चितच यथा योग्यच ठरले.

# विभागीय केंद्र, नागपूर

## ★ कार्यवृत्त ★

**१० ऑक्टोबर :** अपंग हक्क विकास मंच व राज्य अपंग महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजितं विदर्भातील अपंग शेतकऱ्यांसाठी फळबाग प्रशिक्षण व अर्थसाहाय्य यासाठी आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या आयोजनात विभागीय केंद्राचा सहभाग होता.

या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. ना. श्री. अनिल देशमुख, खासदार मा. श्री. दत्ताजी मेघे, आमदार श्री. गिरीश गांधी, आमदार श्री. रमेश बंग, श्री. सुभाष काळे इ. उपस्थित होते.

मा. खासदार सौ. सुप्रिया सुळे यांनी विदर्भातील कुपोषण दूर करण्यासाठी युनिसेफच्या सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर राबविल्या जाणाऱ्या "पायलट प्रोजेक्टची" सविस्तर माहिती दिली.

सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. श्री. अनिल देशमुख यांनी बांधकाम करताना होणाऱ्या अपंगाची दखल घेण्यात येईल असे आश्वासन दिले तर खासदार श्री. दत्ताजी मेघे म्हणाले की आपल्या विविध संस्थांमध्ये दरवर्षी ४ नवीन अपंग लोकांना नोकरी देण्यात येईल.

विदर्भाच्या विविध भागातून ५०० सदस्य उपस्थित होते. कार्यशाळेच्या संचालनाचे जबाबदारी मेघा काळे यांनी तर श्री. विजय कान्हेकर, अभिजित राऊत यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

**१३ ऑक्टोबर :** ओंकार एज्युकेशनल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. म. वा. ओंकार यांच्या 'रायझिंग प्रायसेस : रिझन्स अँड रेमेडिज' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे अ. भा. ग्राहक पंचायतचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ पोफळी यांनी पुस्तकाचे प्रकाशन केले. ते या निमित्ताने म्हणाले श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढत आहे. हे चित्र बदलण्यासाठी कामगार चळवळींची सक्षमता तसेच सामाजिक बांधिलकी जोपासून काम करणे गरजेचे आहे. अर्थशास्त्राचे प्रसिद्ध अभ्यासक डॉ. श्रीनिवास खांदेवाले म्हणाले की वाढत्या विकास दराचा सामान्य जनतेला, कामगारांना कुठलाच फायदा होत नाही. श्री. गिरीश गांधी यांनीही आपले विचार मांडले.

प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. विजय जिचकार याप्रसंगी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. मेघा कानेटकर यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. चंद्रभान भोयर यांनी केले.

**२३ ऑक्टोबर :** आधार आणि अभिव्यक्ती यांच्या संयुक्त विद्यमाणे मराठी साहित्यावर स्वतंत्र नाममुद्रा कायम करणारे श्रेष्ठ कवी अनिल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भव्यदिव्य असा संगीतमय 'सारेच दीप उजळले आता' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

कार्यक्रमाची संकल्पना व लेखन कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांची होती. डॉ. अक्षयकुमार काळे आणि डॉ. आशा सावदेकर यांनी कवी अनिलांच्या आठवणी सांगत त्यांच्या काव्यनिर्मितीचे यथोचित मूल्यमापन केले. सौ. मनीषा साधू व श्री.

जयंत पात्रीकर यांनी कवी अनिलांच्या कवितांचे अभिवाचन केले. तर वैशाली उपाध्ये, विनोद वरवरे व सौ. सुचित्रा कातरकर यांनी कवी अनिल यांची विविध गीते सुरेल आवाजात सादर केली.

या उत्कृष्ट निर्मितीमागे सौ. शुभदा फडणवीस, डॉ. अविनाश रोडे आणि प्रतिष्ठानचे सचिव श्री. गणेश नायडू यांचे परिश्रम होते.

**१४ ऑक्टोबर :** रंगधून आणि स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. रत्नाकर भेलकर यांच्या 'जटायू आणि इतर कथा' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. रवीन्द्र ठाकूर, डॉ. प्रज्ञा आपटे, हिन्दी साहित्यिक डॉ. ओमप्रकाश मिश्रा अतिथी म्हणून उपस्थित होते. याव्यतिरिक्त मंचावर प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. विजय जिचकार व चित्रकार श्री. अरुण मोरघडे उपस्थित होते.

**१८ नोव्हेंबर :** नाटककार वि. रा. हंबर्डे यांच्या जन्मशताब्दिनिमित्त नाटककार वि. रा. हंबर्डे जन्मशताब्दी समितीच्या संयुक्त विद्यमाने 'नाटककार वि. रा. हंबर्डे यांची नाटके' याविषयावर परिसंवाद आयोजित केला.

डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी वि. रा. हंबर्डेंच्या पौराणिक नाटकांवर, डॉ. संध्या अमृते यांनी ऐतिहासिक नाटकांवर व प्रा. राजन जयस्वाल यांनी सामाजिक नाटकांवर विचार व्यक्त केले.

विशेष अतिथी श्री. गिरीश गांधी म्हणाले केवळ ५५ वर्षांच्या आयुष्यात ३१ नाटके, ८ कादंबऱ्या, एक कथासंग्रह ही साहित्यनिर्मिती प्रचंड आहे. त्यांच्या 'झांशीची राणी', 'बाजीराव मस्तानी', 'बिगारीचा बैल' या नाटकांचे मुंबईच्या व्यावसायिक रंगभूमीवर प्रयोग झाले.

अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर म्हणाले की विदर्भातील राष्ट्रप्रेमी व ज्वलंत लेखणीचे नाटककार वीर वामनराव जोशी यांच्यानंतर आपण एकदम पुरुषोत्तम दारव्हेकर यांचेच नाव घेतो .पण मधल्या काळात वैदर्भीय रंगभूमीची चळवळ आपल्या लेखणीने तेवत ठेवणारे व नाट्यसृष्टी जागृत ठेवणारे नाटककार म्हणून वि. रा. हंबर्डे यांचा उल्लेख करावा लागेल.

याप्रसंगी वि. रा. हंबर्डे यांच्या 'राजमाता जिजाबाई' या कादंबरीचे प्रकाशन मा. श्री. गिरीश गांधी यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. धनश्री बोरीकर तर आभारप्रदर्शन डॉ. विजय हंबर्डे यांनी केले.

**२५ नोव्हेंबर :** महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त यु. आर. एल. फाऊंडेशन, मुंबईच्या संयुक्त विद्यमाने मराठी-उर्दू गजलांचा संगीतपूर्ण कार्यक्रम 'आभाळ चांदण्यांचे' सादर करण्यात आला.

श्रेष्ठ गायक श्री. माधव भागवत आणि श्रेष्ठ गायिका हेमा उपासनी यांनी आपल्या कसलेल्या स्वरांनी सर्व गजला एकापेक्षा एक सरस सादर केल्या.

श्री. गिरीश गांधी यांनी प्रास्ताविक केले. मा. नानासाहेब शेवाळकर, खासदार श्री. दत्ता मेघे, श्री. उदयदादा लाड, पूर्वमंत्री श्री. पद्मसिंह पाटील, सांस्कृतिक राज्यमंत्री राणा जगजितसिंह पाटील, साहित्यिक डॉ. गोविंद वर्मा, पत्रकार श्री. बाळ कुळकर्णी यांचेसह अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर तर आभारप्रदर्शन श्री. गणेश नायडू यांनी केले.

**६ डिसेंबर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. आंबेडकरांचे विचार आणि आजची सामाजिक परिस्थती' या विषयावर परिसंवाद आयोजि केला होता.

अध्यक्षस्थानी डॉ. प्रमोद मुनघाटे होते. ज्येष्ठ अभ्यासक - समीक्षक डॉ. भाऊ लोखंडे या परिसंवादात बोलताना म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे पालन आपण न केल्यामुळेच आज खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होऊ शकली नाही. बाबासाहेबांचे विचार सर्वकालीन आहे. अस्पृश्यांचा प्रश्न मांडतानाही त्यांनी राष्ट्रीयत्वाच्या भावनेला धक्का लागू दिला नाही.

या परिसंवादात आपले विचार मांडताना डॉ. ज्योती लांजेवार म्हणाल्या की आपल्या मनातील विषमता दूर केल्याशिवाय बाबासाहेबांचे विचार समजू शकणार नाहीत. या महामानवाला विशिष्ट जाती-जमातीच्या आवरणात संकुचित करण्याची मानसिकता चुकीची आहे.

प्रा. वामन निंबाळकर म्हणाले की संसदीय लोकशाहीला अतिशय पूरक असे संविधान बाबासाहेबांनी दिले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गणेश नायडू यांनी केले.

**२५ डिसेंबर** : अक्षरभूषण मधुकरराव भाकरे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने नव्वद हजार विद्यार्थ्यांचा सहभाग असलेल्या 'सुंदर हस्ताक्षर' स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

जीवनातील सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी व देण्यासाठी हस्ताक्षर सुंदर असणे आवश्यक आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर सुंदर हस्ताक्षराची चळवळ राबविली गेली पाहीजे असे प्रतिपादन ज्येष्ठ व श्रेष्ठ चित्रपट दिग्दर्शक राजदत्त यांनी याप्रसंगी केले.

प्रतिष्ठानचे श्री. गिरीश गांधी यांनी प्रास्ताविक केले. परीक्षक श्री. गणेश नायडू यांनी मनोगत व्यक्त केले.

जिल्हा परिषदचे अध्यक्ष श्री. रमेश मानकर, महेश करजगावकर, अशोक मानकर यांनीही सुंदर अक्षरांविषयी आपले विचार मांडलेत. मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे स्वरुप असलेले गुणानुक्रमे तीस पुरस्कारांचे वितरण याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

**२७ डिसेंबर** : डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त 'आजच्या शेतीची दुरवस्था' या महत्वपूर्ण विषयावर ज्येष्ठ पत्रकार श्री. चंद्रकांत वानखडे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी शेतकरी आणि शेती यांच्या दुरवस्थेचे बारकाईने वर्णन करुन या अवस्थेला कारणीभूत असलेली धोरणे व या अवस्थेकडे पाहण्याची समाजाची दृष्टी विषद करुन सांगितली.

सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. गणेश नायडू यांनी केले.

**११ जानेवारी** : महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा यांच्या संयुक्त विद्यमाने उदयोन्मुख कवयित्री सीमा पठाण हिच्या उर्दू कवितांचा व गजलांचा संग्रह 'सरे राह' चा प्रकाशन समारंभ संपन्न झाला.

महानगर पालिकेचे माजी शिक्षणाधिकारी म्हणाले हिन्दी आणि उर्दू भाषांमधून पुस्तक प्रकाशन होण्याची ही पहिलीच वेळ आहे. या अभिनव प्रयोगामुळे दोन्ही भाषा जवळ येतील.

डॉ. अक्षयकुमार काळे म्हणाले की उर्दू कविता विशेषतः गजलेला सुंदर शब्द, विचार, नाजूक भावना आणि कुशलतेने अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य कवयित्रीच्या लेखनातून जाणवते.

श्री. कामिल अन्सारी आणि श्री. गिरीश गांधी यांनी कवयित्रीचे अभिनंदन करुन तिला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुन तिला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मोहम्मद यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. प्रमोद शर्मा यांनी केले.

**१२ जानेवारी :** नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे देण्यात येणाऱ्या यंदाच्या यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कारांचा वितरण समारंभ नागपूर येथे आयोजित करण्यात आला. या आयोजनात विभागीय केंद्र, नागपूरचा संपूर्ण सहभाग होता.

श्री. हेरंब कुलकर्णी आणि वैशाली शिंदे यांना हे पुरस्कार देण्यात आले. याप्रसंगी श्री. गिरीश गांधी व प्रमुख अतिथी डॉ. पंकज चांदे व मा. अजित जोशी यांनी विचार व्यक्त केले.

श्री. हेरंब कुलकर्णी व श्रीमती वैशाली शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले. सूत्रसंचालन सौ. शैला जेमिनी यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री. गणेश नायडू यांनी केले.

**१४ जानेवारी :** चाणक्यपुरम परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने मकरसंक्रांतीच्या पूर्वसंध्येला चाणक्यपुरमच्या मैदानावर कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले.

श्री. किशोर भुसारी यांच्या 'धस्सकन होते बाई' या कवितेने सुरुवात झालेले हे कविसंमेलन उत्तरोत्तर रंगत गेले. विजया ब्राम्हणकर यांनी 'शेतकऱ्याच्या शिवारातील पीख' आणि 'राधा बावरे', सुमती वानखेडे यांनी 'प्रेम म्हणजे काय' आणि 'मोबाईल' ही वऱ्हाडी कविता, विजया मारोतकर यांनी 'पुरी हौस फिटली' आणि 'बळीराजाचे प्रारब्ध', मनिषा साधू यांनी 'प्रेमाची किमया' व 'वैदेही' या कविता सादर करुन श्रोत्यांना खिळवून ठेवले.

अध्यक्षस्थानी असलेल्या प्रा. ज्ञानेश वाकुडकरांनी 'तंटामुक्ती', 'म्हैस' 'पेरली ओठावर साखर' अशा सामाजिक आणि राजकीय व्यंगात्मक कविता सादर करुन कविसंमेलनात निरनिराळे रंग भरले.

सूत्र-संचालन मनीषा साधू यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री. गणेश नायडू यांनी केले.

याचप्रसंगी महाविद्यालयीन युवा काव्य-स्पर्धेचे पारितोषिक वितरणही करण्यात आले.

**२० जानेवारी :** माग्रस योजना, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने '४१ वा माग्रस आनंदोत्सव' संपन्न झाला.

उद्घाटन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त रंजना पाठक यांच्या हस्ते करण्यात आले.

यानिमित्ताने श्री. दिनकर बेडेकर लिखित-दिग्दर्शित 'सुट्टी...सुट्टी' या श्रुतिनाटकाचे सादरीकरण करण्यात आले.

या श्रुतिनाटकात शिरीष व संध्या दारव्हेकर, प्रा. प्रदीप देवघरे व दीपलक्ष्मी भट, डॉ. वृंदा जोगळेकर व प्रा. सुरेश खेडकर आणि माधुरी बेडेकर व डॉ. देवाशिष नाहा यांनी समरसून अभिवाचन केले.

# विभागीय केंद्र - औरंगाबाद अपंग शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन मेळावा

## ★ कार्यवृत्त ★

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद, नवमहाराष्ट्र युवा अभियान अपंग हक्क व विकास मंच यांच्या वतीने राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ, राष्ट्रीय अपंग वित्त व विकास निगम, अपंग आर्थिक विकास महामंडळ या सर्व संस्थांच्या सहकार्याने मराठवाडा व खान्देशातील अपंग शेतकऱ्यांसाठी फळबाग लागवड मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते. दि. २० सप्टेंबर २००७ रोजी दिवसभर पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उद्‌घाटन अ. आ. वि. म. चे व्यवस्थापकिय संचालक मा. वसंत संख्ये, एन. एच. बी. चे. मा. उमेदसिंग, विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष मा. सचिन मुळे मा. सुहास काळे, मा. मेघा काळे, मा. दत्ता बाळसराफ, मा. विजय कान्हेकर यांच्या उपस्थितीत झाले. या मेळाव्यात दिवसभर विविध तज्ञांनी मार्गदर्शन केले. पहिल्या सत्रात मा. वसंत संख्ये यांनी महामंडळाच्या विविध योजनांविषयी माहिती दिली. त्यानंतर एन. एच. बी. चे. उमेदसिंग यांनी फळबाग लागवड व कर्ज सुविधा व अनुदान या संदर्भात मार्गदर्शन केले. मिटकॉन चे अभय कुलकर्णी यांनी फळप्रक्रिये संदर्भात मार्गदर्शन केले. मा. सुहास काळे, मा. कांबळे, मा. विजय कान्हेकर यांनी देखील उपस्थित अपंग शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या मेळाव्याचा समारोप यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विश्वस्त मा. सुप्रिया सुळे, नगरविकास राज्यमंत्री मा. ना. राजेश टोपे, मा. बापुसाहेब काळदाते, मा. डॉ. कैलास कमोद, मा. दत्ता बाळसराफ, मा. विश्वास ठाकुर, मा. सचिन मुळे यांच्या उपस्थितीत झाला. या मेळाव्याला सुमारे आठशेच्या वर अपंग शेतकऱ्यांची उपस्थिती होती. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी विकागीय केंद्राचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली मा. विजय कान्हेकर, मा. सुहास तेंडुलकर, मा. राजाभाऊ गोकुळाष्टमी, युवा अभियानाचे विभागीय संघटक नीलेश राऊत, सुबोध जाधव, अभिजीत विटोरे, गणेश धुले, आदिंनी परीश्रम घेतले.

# चव्हाण पुण्यतिथी संपन्न

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र औरंगाबाद व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ नोव्हेंबर ०७ आदरणिय यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी आ. चव्हाण साहेबांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी महिला व्यासपीठाच्या संयोजिका प्रा. लिला शिंदे, ग्रंथालीचे धनंजय गांगल, सुदेश हिंगलासपुरकर, अरुण जोशी, सुधिर सेवेकर, डॉ. अजित व विनया भागवत नवमहाराष्ट्र युवा अभियाणाचे विभागीय संघटक निलेश राऊत अपंग हक्क विकासमंचचे सुहास तेंडुलकर, संध्या मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी मान्यवरांनी यशवंत चव्हाण साहेबांच्या विचारांना उजाळा दिला. नवमहाराष्ट्र युवा अभियान विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतिने घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांच्या माहीतीसाठी 'राखण' या साप्ताहिकाच्या सहकाऱ्याने युवा विशेषांक काढण्यात आला. यात नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या विविध स्पर्धां विषयी व उपक्रमांविषयी माहिती देण्यात आली आहे.

# कृषी सहकार व्यासपीठ व विभागीय केंद्र पुणे

## ★ कार्यवृत्त ★

पुणे केंद्राचे अध्यक्ष डॉ. राम ताकवले माजी अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर खैरे, निमंबक डॉ. भागवतराव पवार तसेच श्री. अंकुश काकडे व श्री. शांतीलाल सुरतवाला यांचे मार्गदर्शनाखाली प्रतिष्ठानचे कार्यक्रम होतात. प्रतिष्ठानच्या या सर्व कार्यक्रमांना पद्मविभूषण मा. मोहन धारीया साहेब यांचे मार्गदर्शन मिळते. दैनंदिन कामकाजात श्री. शं. त्रिं. भिडे, प्रा. प्र. त्र्यं. पंडित यांचा मोठा सहभाग असतो.

डॉ. राम ताकवले यांची पुणे केंद्र अध्यक्ष म्हणून व डॉ. भागवतराव पवार कृषी सहकार व्यासपीठाचे निमंत्रण म्हणून नियुक्त झाल्यावर पहिली सभा दि. ९ ऑक्टोबर ०७ रोजी बापूसाहेब खैरे यांच्या उपस्थितीत पार पडली. त्यात पुणे विभागीय केंद्राचे कामकाज म्हणजेच विभागीय सांस्कृतीक कार्यक्रम, विभागीय महिला व्यासपीठ कार्यक्रम व विभागीय नव महाराष्ट्र युवा अभियान हे कार्यक्रम डॉ. राम ताकवले यांचे देखरेखीखाली तर कृषी व सहकार व्यासपीठाचे महाराष्ट्रासाठीचे कार्यक्रम डॉ. बी. डी. पवार यांचे देखरेखीखाली चालावेत व त्यासाठी स्वतंत्र कार्यकारी समित्या असाव्यात असे ठरले.

**पुणे केंद्र**

१) 'सध्याची पत्रकारीता' या विषयावर एक विशेष कार्यक्रम मा. अंकुशराव काकडे व मा. शांतीलाल सुरतवाला यांनी कै. निळूभाऊ लिमये यांचे जन्मशताब्दी प्रित्यर्थ आयोजित केला. चर्चा सत्रात डॉ. शा. ब. मुजुमदार, मा. एस. के. कुलकर्णी यांनी उद्‌बोधन केले. प्रास्ताविक मा. श्री. काकडे यांनी केले. तसेच मा. सुरतवाला यांनी आभार मानले.

२) दि. १३.१२.०७ रोजी 'कुपोषण' या डॉ. खताळ पाटील लिखित पुस्तकाचे प्रकाशन मा. अंकुश काकडे व मा. शांतीलाल सुरतवाला यांचे पुढाकाराने आयोजित करण्यात आले. विश्वस्त मा. बापूसाहेब खैरे, आगाखान गांधी स्मारकाच्या प्रमुख मा. श्रीमती शोभनाताई रानडे व मा. मोहन धारिया यांनी मार्गदर्शन केले.

३) 'देणे मंगेशाचे' हा उत्तम सुश्राव्य शास्त्रीय व भावगीत गायनाचा कार्यक्रम मा. अंकुश काकडे व मा. शांतीलाल सुरतवाला यांनी दि. २१-१-०८ रोजी आयोजित केला. त्यात पं. भरत बलवल्ली यांचा मा. श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचे हस्ते सस्कार करण्यात आला. कार्यक्रमास रसिकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

४) साप्ताहिक 'रविवार सकाळच्या' २ ऑक्टोबर २००७ रोजी झालेल्या वर्धापन दिनाचे कार्यक्रमात मा. ना. श्री. शरद पवार यांनी केलेल्या भाषणावर आधारित 'उद्याचा महाराष्ट्र अपेक्षा व आव्हाने' हे पुस्तक प्रकाशित करण्याचा कार्यक्रम, प्रतिष्ठान, राष्ट्रवादी ग्रंथालय विभाग व अनेय प्रकाशनच्या संयुक्त विद्यमाने दि. २९.१.०८ रोजी थाटात पार पडला. सदर पुस्तकाचे प्रकाशन राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. आर. आर. पाटील यांचे हस्ते झाले. त्यात मा. डॉ. राम ताकवले यांनी व्याख्यान दिले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा. आ. अरुण गुजराथी होते. प्रास्ताविक श्री. काकडे व आभार प्रदर्शन श्री सुरतवाला यांनी केले.

५) प्रतिवर्षाप्रमाणे काही हजार वारकऱ्यांना वारीमध्ये फराळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी मा. अंकुशराव काकडे, प्रा. पंडीत व महिला संयोजिका डॉ. शेवाळे उपस्थित होते.

६) रंगारंग दिवाळी पहाटचा बहारदार कार्यक्रम मा. अकुंशराव काकडे व शांतीलाल सुरतवाला यांचे पुढाकाराने दि. ९.११.०७

रोजी सारसबागेत, स्वरालय, भावरंग आदी संस्थांच्या उच्च दर्जाच्या कलावंतांच्या सादरीकरणानी साजरा झाला. त्यास सुमारे ५ हजार पुणेकरांनी दाद दिली. या वर्षीचा पुरस्कार मा. श्री. बाबासाहेब पुरंदरे यांना श्री. अरुण दाते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यात श्री भरत बलवल्ली, राजेंद्र कुलकर्णी आदींचा सहभाग होता.

७)यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, पुणे केंद्र, लोकमान्य प्रतिष्ठान व स्फूर्ती महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मा. अंकुशराव काकडे मा. सुरतवाला यांचे पुढाकाराने दि. २७.१०.०७ रोजी सुवर्ण ज्योती कार्यक्रम घेण्यात आला.

८) प्रतिवर्षीप्रमाणे घेतलेल्या ५० वर्षावरील व्यक्तींच्या पर्वती चढण्याच्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम दि. १२.१२.०७ रोजी घेण्यात आला. मा. शांतीलाल सुरतवाला व मा. काकडे यांनी कार्यक्रम संयोजन केले.

**महिला व्यासपीठ**

१) सुहासिनी करंडकासाठी प्रतिवर्षाप्रमाणे दि. २०.१०.०७ रोजी स्पर्धा घेण्यात आली. त्यास प्रतिष्ठानने सहकार्य केले.

२) बचत गटा संबंधीचे काम श्रीमती शैला लिमये यांनी चालू ठेवले आहे. Spensers च्या दुकानात काऊंटरवर बचत गटांनी तयार केलेल्या 'माझी मैत्रीण' ब्रँडच्या वस्तु ठेवण्याचा प्रयत्न आहे.

३) सोस्वा-स्पाटी या संस्थेत प्रशिक्षण विषयक चर्चा सत्रात श्रीमती लिमये व प्रा. पंडित सहभागी झाले.

**नव महाराष्ट्र युवा अभियान, पुणे**

नव महाराष्ट्र युवा अभियान, पुणे यांचे काम श्री. भैय्यासाहेब खैरे, समन्वयक पुणे विभाग आणि विलास लोंढे संघटक हे पाहतात.

**अन्य संस्थांचा कार्यक्रमात सहभाग**

१) राष्ट्रीय विमा अकादमी येथे मानवी अधिकार संरक्षणासाठी ॲम्नेस्टी इंटरनॅशनल व राष्ट्रीय विधी सहाय्य सेवा यांचेवतीने मा. अपर न्यायमूर्ती श्रीमती रोशन शमीम दळवी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास प्रा. पंडित उपस्थित राहिले व प्रतिष्ठानच्या महिला व्यासपीठाच्या वतीने घेतलेल्या व घ्यावयाच्या 'नाल्सा' कार्यक्रमासंबंधी दि. २८.१०.०७ रोजी चर्चा केली

२) सोस्वा/ स्पाटी संस्थेच्या निमंत्रणावरून मा. खा. सुप्रिया सुळे यांनी सुरू केलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या बैठकीस श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडित यांनी उपस्थित राहून सहभाग घेतला.

३) पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू कै. डॉ. वि. ग. भिडे यांनी स्थापना करून उत्तम रित्या चालवलेल्या चळवळीच्या स्टिअरिंग कमिटीवर प्रतिष्ठानच्यावतीने प्रा. प्रभाकर पंडित काम करतात. सदर समितीच्या या कालावधीत झालेल्या बैठकीत त्यांनी सक्रीय सहभाग घेतला व कार्यक्रम विषयक मुद्दे मांडले २००५-०६ पासून प्रा. पंडित यांची सेक्रेटरी जनरल (आउटस्टेशन) अशी नियुक्ती झाली आहे. चळवळीच्या समोरासमोर (फेस टू फेस) या मासिक मराठी व इंग्रजी कार्यक्रमांना प्रा. पंडित सक्रीय भाग घेतात. त्यापैकी दि. ६.१०.०७ च्या कार्यक्रमात प्रा. अरुण निगवेकर यांचे 'ज्ञानचे माहात्म्य' (नॉलेज अँड इंपर्टिन्स) या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी श्री. पंडीत यांनी त्यांना प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती दिली.

पुढील सहा महिन्यातील महत्त्वाचे कार्यक्रम

**कृषी सहकार व्यासपीठ**

एप्रिल, मे व जून २००८ गोखले इन्स्टिटयुटचे संचालक यांचेशी डॉ. बी. डी. पवार यांच्या झालेल्या चर्चेनुसार दरमहा कृषी सहकार व ग्रामीण विकास यांच्याशी निगडीत विषयावर संयुक्त कार्यक्रम यामध्ये लिंगभेदामुळे महिलांचे सहभागावर होणारा कृषी व्यवसायामधील अन्याय हा विषय घेण्यात येणार आहे.

जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २००८ वरील प्रमाणे चर्चा करून इंडियन सोसायटी फॉर पोलिटिकल इकॉनॉमी या संस्थेबरोबर संयुक्त कार्यक्रम घेण्यात येतील. त्यामध्ये मा. ना. पवार साहेब यांचे भाषणावर आधारित पुस्तक 'उद्याचा महाराष्ट्र अपेक्षा व आव्हाने' यामधील विषयावर तज्ज्ञांची चर्चासत्रे आयोजण्याचा विचार आहे.

# विभागीय केंद्र कराड

**१. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कराड केंद्राचा निकाल १०० टक्के :**

शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तारकार्य योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम परीक्षेमध्ये विभागीय केंद्र, कराडचा निकाल १०० टक्के लागला.

या परीक्षेत **गितांजली थोरात (७१%), आदिती डोईफोडे (७०.४२%) वर्षा शिंदे (७०.४२%)** यांना यश मिळवले.

या परीक्षेस कराड केंद्रातून एकूण ३३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तर ११ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत झाले आहेत.

**२. महात्मा गांधी जयंती - ३ ऑक्टोबर २००७ :** राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या १३८ व्या जयंतीचे औचित्य साधून उपपंतप्रधान स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या ग्रंथसंग्रहातील गांधीजींनी स्वतः लिहिलेली व त्यांच्याविषयी इतरांनी लिहिलेले ग्रंथ त्याचबरोबर गांधीजीच्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन कराडकरांना पहावयास, अनुभवायला मिळाले.

सौ. वेणुताई चव्हाण स्मारकात प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रतिष्ठानचे सचिव **श्री. मोहनराव डकरे** यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

**३. सह्याद्रीचे वनवैभव - ७ ऑक्टोबर २००७ :** कल्पना चावला विज्ञान केंद्र-कराड यांच्या संयुक्त विद्यमाने ''सह्याद्रीचे वनवैभव'' या विषयावर स्लाईड शो सह वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. चंद्रकांत साळुंखे (M.Sc., Ph.d) यांचे व्याख्यान झाले.

जागतिक वन्यजीव सप्ताहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जगातील उत्कृष्ट वनस्पतीच्या जाती सह्याद्रीच्या परीसरात मिळतात यातील काही जाती आता नामशेष होण्याच्या मार्गावर असून त्यांचे आता संगोपन करण्याची आवश्यकता व महत्व त्यांनी या प्रसंगी सांगितले. सह्याद्रीच्या वनवैभवातील अमोल ठेवा, वनस्पती व सृष्टी सौंदर्याची माहिती स्लाईड शोच्या माध्यमातून अत्यंत दिलखुलासपणे डॉ. साळुंखे यांनी सांगितली. डॉ. एस. एस. पाटील यांनी डॉ. चंद्रकांत साळुंखे यांचा परिचय करुन दिला. या कार्यक्रमासाठी **मा. खा. श्रीनिवास पाटील, मा. आ. बाळासाहेब पाटील** यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी निसर्ग प्रेमी, पर्यावरण प्रेमी लोकांची प्रमुख उपस्थिती होती.

**४. महिला बचत मेळावा - १६ ऑक्टोबर २००७ :** बचत गटांतून तयार होणारा माल हा गुणवत्ता प्राप्त असला पाहिजे. बचत गटाला व्यवसाय वाढवण्याच्या दृष्टीने, अर्थ साह्याच्या दृष्टीने योग्य मार्गदर्शन व्हावे यासाठी दिवंगत जाई मोहिते नागरी सहकारी पतसंस्था प्रेरणा महिला बचत गट फेडरेशन व जाई मोहिते सोशल वेल्फेअर फाँडेशन

यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बचत केंद्र मेळावा आयोजित करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण स्मृतिसदनात झालेल्या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी कराड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी **श्री. अनिल सोनवणे** होते प्रमुख मार्गदर्शक जिल्हा बँकेचे स्वयं सहाय्यता बचत गट विकास अधिकारी **श्री. सुजित शेख,** कवठे पिरानचे ग्रामविकास अधिकारी **श्री. मदन यादव, सौ. सविता मोहिते, सौ. शोभना रैनाक,** यांची प्रमुख उपस्थिती होती.

**५. स्व. यशवंतराव चव्हाण २३ वी पुण्यतिथी - दि. २५ नोव्हेंबर २००७ :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार **मा. यशवंतराव चव्हाण** यांच्या २३ वी पुण्यतिथी निमित्त कराड शहरात विविध कार्यक्रम आयोजित झाले. आदरणीय **ना. शरदरावजी पवार,** कृषी मंत्री भारत सरकार, मा. ना. विलासरावजी देशमुख मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, राज्य मंत्रीमंडळातील विविध सदस्य, आदरणीय ज्येष्ठ नेते पी. डी. पाटील साहेब यांच्या प्रमुख उपस्थित प्रीतिसंगमावरील समाधीला पुष्पचक्र वाहिले.

सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड मधील स्व. यशवंतरावजी चव्हाण व सौ. वेणुताई चव्हाण यांच्या पुतळ्यास विविध मान्यवरांनी पुष्पांजली अर्पण करुन आदरांजली वाहिली.

**६. स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या प्रतिमेची मिरवणूक व पदयात्रा :** दुपारी ४ वाजता सजवलेल्या बगीमध्ये स्व. यशवंतरावजीची प्रतिमा ठेवून भव्य पदयात्रा काढण्यात आली. सौ. वेणुताई चव्हाण स्मारण स्मारक-विरंगुळा बंगला-यशवंतराव चव्हाण स्मृती सदन टिळक-हायस्कुल-चावडी चौक बालाजी मंदीर मार्गे शेवटी समाधीस्थळ अशी पदयात्रा निघाली. या पदयात्रेमध्ये कराडच्या नगराध्यक्षा **सौ. सुषमा लोखंडे,** सर्व नगरसेवक, नगरसेविका, श्री. शिवाजी शिक्षण संस्थेची सर्व प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक मधील सर्व कर्मचारी वर्ग, विविध शिक्षण संस्थांचे प्रमुख, कराड शहरातील विविध मान्यवर पदयात्रेमध्ये सहभागी झाले होते. सायंकाळी ५ वाजता समाधी स्थळी पदयात्रा पोहचली व समाधी लगतच आदरांजली सभेत रुपांतर झाले.

ज्येष्ठ नेते आदरणीय **पी. डी. पाटील साहेब, प्रा. अशोकराव चव्हाण, अॅडव्होकेट मानसिंगराव पाटील, श्री. मुकुंदराव कुलकर्णी, सौ. शोभना रैनाक, श्री. राजेश पाटील** यांनी अत्यंत भावपूर्ण शब्दात स्व. यशवंतरावजी चव्हाण यांना आदरांजली वाहिली. **श्री. मोहनराव डकरे** यांनी आभार मानले.

**७. मा. ना. शरद पवार यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे व रांगोळी प्रदर्शन :** केंद्रीय कृषीमंत्री **मा. ना. शरदरावजी पवार साहेब** यांचा वाढदिवस १२ डिसेंबर व **सौ. प्रतिभाताई पवार** यांचा वाढदिवस १३ डिसेंबर २००७ चे औचित्य साधून विभागीय केंद्र-कराड व सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडच्या वतीने रांगोळीतून साकारल्या. मा. शरद पवारच्या भावमुद्रा व दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

**अ) छायाचित्रांचे प्रदर्शन :**

केंद्रीय कृषिमंत्री मा. ना. शरद पवार यांच्या बालपनापासून देशाच्या संरक्षण मंत्री कृषी मंत्री पदाच्या कार्यकर्तृत्वाचे वेगवेगळे पैलू दाखवणाऱ्या आणि त्यांच्या जीवनावरील

विविध प्रसंगाचे दर्शन घडवणाऱ्या महत्वपूर्ण प्रसंगाचे छायाचित्रांचे प्रदर्शन सौ. वेणुताई चव्हाण स्मारकात आयोजित केले होते.

**ब) रांगोळीतून साकारल्या भावमुद्रा :** मा. ना. शरदरावजी पवार साहेब, सौ. प्रतिभाताई पवार, त्यांची नात यांची लक्षवेधी रांगोळी कलाकारांनी सादर केली आहे. सृजनसृष्टी ग्रुपच्या माध्यमातून सांगली, सातारा, इचलकरंजी, धामणेर मधील रांगोळीकारांना आमंत्रित करण्यात आले होते. ४८ तासाहून अधिक वेळात ही रांगोळी चितारण्यात आली.

या रांगोळी प्रदर्शन व छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन **मा. आ. बाळासाहेब पाटील** व **मा. विलासराव पाटील (बापू)** यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सुमारे १० हजार पेक्षा अधिक लोकांनी या प्रदर्शनाचा अस्वाद घेतला दिनांक १२ डिसेंबर ते १६ डिसेंबर अखेर सकाळी ९ ते सायंकाळी ९ वाजेपर्यंत प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते. कराड व बाहेरगावच्या विविध शाळा, सहली व मान्यवरांनी प्रदर्शनास भेट दिली. छायाचित्रे व रांगोळी प्रदर्शनास भेट दिलेल्या ६६६७ रसिकांची नोंद आहे. खासदार मा. श्रीनिवास पाटील यांनीही प्रदर्शनास आवर्जुन भेट दिली.

**क) नेत्रदान संकल्प :** मा. पवार साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त विभागीय केंद्र-कराडचे सचिव **श्री. मोहनराव कृष्णाजी डकरे** यांनी मरणोत्तर नेत्र दानाचा संकल्प केला. येथील **रामविलास किसनलाल लाहोटी नेत्र रुग्णालय** व **लायन्स क्लब कराड** यांच्या नेत्रपेढीत नेत्रदानाचा अर्ज दिला.

**८. सौ. वेणुताई चव्हाण जयंती व निसर्ग चित्र रेखाटन स्पर्धा :** स्व. सौ. वेणुताई यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कराड व सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्ट, कराड आयोजित निसर्ग चित्र रेखाटन स्पर्धा दि. २, ३ फेब्रुवारी २००८ रोजी आयोजित करण्यात आली. कलाविष्कार कराडचे सचिव **श्री. सतिश गायकवाड, श्री. विकास शेवाळे,** महाराष्ट्रातून आलेले विविध रंगकर्मी उपस्थिती होते.

**मा. प्रकाशबापू पाटील,** कराड, **मा. मोगंलाल श्रावस्ती चित्रकार, मुंबई** व **मा. श्री. मोहनराव कृष्णाजी डकरे** यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षिस समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. या स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक खालील प्रमाणे.

**जे. डी. आर्ट 'गट'**

१) दिलीप रघुनाथ दुधाणे - पुणे
२) उमेश इराण्णा मिरजी - सांगली
३) संदीप अशोक घुले - इचलकरंजी

**ए. टी. डी. 'गट'**

१) अभिजीत दत्तात्रय कांबळे- इचलकरंजी
२) प्रदीप आण्णासो पाटील - इचलकरंजी
३) मानसिंग मधुकर पाटील - कोल्हापूर

या स्पर्धेतील सर्व चित्रांचे प्रदर्शन दि. १२ मार्च २००८ रोजी सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्ट मध्ये आयोजित केले जाणार आहे.

# अपेक्षित कार्यक्रम / उपक्रम वृत्तांत (१ जानेवारी २००८ ते ३१ मार्च २००८ अखेर)

**१. एड्स प्रबोधन कार्यशाळा - १२ फेब्रुवारी २००८ ते १५ फेब्रुवारी २००८ :**

क्षेत्रिय प्रचार कार्यालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स जनजागरण प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १२ फेब्रुवारी रोजी कोयना शिक्षण संस्था - पाटण व दिनांक १५ फेब्रुवारी रोजी शिवाजी शिक्षण संस्था कराड येथे या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

**२. डाक्युमेंट्री फिल्म दाखवणे :** ११ फेब्रुवारी व १४ फेब्रुवारी रोजी कोणत्याही छोट्या दोन गावामध्ये प्रबोधनात्मक डॉक्युमेंट्री फिल्मस् दाखवण्यात येणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने...

१) ग्राम प्रबोधन

२) स्वच्छता

३) महिला बचत गटाची कार्यपद्धती व उद्योगधंदा मार्गदर्शन, बचत गटांना बाजारपेठ.

४) सौर उर्जा

५) जागतिकीकरण

६) विज बचत.

**३. चित्रपट महोत्सव :** गतवर्षी चित्रपट महोत्सवाला अत्यंत उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

यातूनच यावर्षी ''चित्रपट महोत्सवाचे'' आयोजन करण्याचे नियोजन आहे. शालेय संस्कार घडवणारी संस्कार फिल्म, कलात्मक फिल्म, राष्ट्रभक्ती, मुल्य शिक्षणाचा अंतर्भाव असणारी फिल्मस् या महोत्सवामध्ये दाखवण्यात येणार आहे. विविध शाळा, महाविद्यालये, ग्रामस्थ नागरीक यांच्याकरिता दाखवण्यात येणार आहे. भारत सरकारचे क्षेत्रीय प्रचार कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे नियोजन करण्याचा प्रयत्न आहे.

**४. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा :** वक्तृत्व स्पर्धेचे विषय स्वर्गीय चव्हाण साहेबांच्या विविध पैलूवर अगोदरच निश्चित करुन दिले जातात. स्पर्धेचे पारितोषिक प्रथम क्रमांक रु. १०००/- ग्रंथ व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक रु. ७००/- ग्रंथ व प्रमाणपत्र तृतिय क्रमांक रु. ५००/- ग्रंथ व प्रमाणपत्र. स्पर्धेचा कार्यक्रम व नियमावली संबंधीत महाविद्यालये यांना अगोदरच पाठवली जाते.

**५. स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबांची जयंती -**

**दि. १२/३/२००८ :** स्व. यशवंतराव चव्हाण यांची ९५ वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्याचा मानस आहे. सकाळी स्व. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणुताई चव्हाण यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या उपस्थित पुष्पहार अर्पण करणे तसेच प्रीतिसंगमावरील समाधीस पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहणे.

प्रीतिसंगमावरील समाधी स्थळी सायंकाळी ७ वाजता विद्यापीठ स्तर वक्तृत्व स्पर्धेत आलेले पाहिले तीन क्रमांकाचे स्पर्धक व प्राथमिक स्तरावरील तीन बाल स्पर्धक यांची स्व. चव्हाण साहेबांचे कार्य व महती सांगणारी भाषणे आयोजीत करणे. आदरणीय ज्येष्ठ नेते **मा. पी. डी. पाटील साहेब** यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करुन आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम संपन्न होईल.

**६. नेत्रदान संकल्प :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र कराडच्या वतीने माहे डिसेंबर २००७ ते ३१ मार्च २००८ अखेर किमान ६ व्यक्तीचे नेत्रदान संकल्प करण्याचा प्रयत्न कराड विभागीय केंद्राचा आहे. त्यासाठी समाजातील परिसरातील इच्छुक व ऐच्छिक व्यक्तिचा शोध घेऊन नेत्रदान करण्याचा मानस आहे.

# विभागीय केंद्र, नासिक

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण यांच्या २३ व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, नाशिकतर्फे रविवार, दि. २५ नोव्हेंबर २००७ रोजी कुसुमाग्रज स्मारक, नाशिक - ४२२ ००५ येथे सायंकाळी ६.०० वाजता सुप्रसिद्ध लेखिका मा. कविता महाजन, यांचे 'माझे लेखन प्रवासातील अनुभवन' या विषयावर जाहीर व्याख्यान संपन्न झाले.

समाजातल्या विविध अनुभवांचे संचित मी गोळी करीत गेले. आदिवासी भागात काम करताना तुमचे असणं बाजुला ठेऊन तुम्ही त्यांच्यात सामील झालात की मग त्यांचे जगणे तुमच्या जाणिवेत उतरु लागते आणि तेच तुमच्या लेखनात अवतरते. या सगळ्या प्रक्रियेतून गेल्यानेच मी 'ब्र' आणि 'भिन्न' या कादंबऱ्या लिहू शकले. आदिवासी भागात गेल्यानेच विविध गोष्टींचे भान मला आले. प्रत्येकाच्या ज्ञानाचे विषय जसे वेगळे असतात तसे अज्ञानाचे विषयही वेगळे असतात हे मी शिकले. बदल व्हावेसे वाटत असतील तर त्या बदलासाठी समाजात उतरताना ती प्रक्रिया स्वतःपासूनच सुरू करावी लागेल. विदारक गोष्टींचा अनुभव पावलोपावली मिळाल्यानेच माझे लेखन हे वास्तव आणि वास्तवाची सांगड घालूनच उतरले आहे. आदिवासी, ग्रामीण जीवनात जाऊन काम करताना समस्यांकडे संधी म्हणून पाहायला हवे याचेही शिक्षण मिळाल्याचे कविता महाजन यांनी सांगितले.

आदिवासी जीवनातले बिकट आणि विदारक अनुभव घेऊन कथा, कादंबऱ्या, भाषणे देण्यापेक्षा या सुधारणेच्या प्रश्नात, प्रक्रियेत स्वतःला झोकून द्यावेसे वाटते. विचार बाजुला ठेवून कृतिशील व्हावेसे वाटते. राजकारण मग ते कोणत्याही क्षेत्रातले असो ते जनसामान्यांपर्यंत थेट परिणाम करते. व्यक्तींच्या अंगी जोपर्यंत निर्णयक्षमता येत नाही तोपर्यंत विकसित झाल्याचे म्हणताच येणार नाही. संस्थांमधले, राजकारणातले, आदिवासी जीवनशैलीतील असंख्य प्रश्न मी अभ्यासले, अनुभवले म्हणून लिहिती झाल्याचे त्यांनी नमूद केले.

स्वयंसेवी संघटनेच्या माध्यमातून काम करताना दोन टोकाचे जग अनुभवता आले. विविधांगी समस्या असलेल्या या समाजातील नकारात्मक गोष्टी मांडाव्यात का ? या विचाराने मला लिहिते केले. मात्र त्यासाठी कुठलीही विशिष्ट शैली मनात नव्हती. 'ब्र' आणि 'भिन्न' या बहुचर्चित कादंबऱ्यांच्या निमित्ताने आलेल्या अनुभवांबरोबरच लेखन प्रवासाविषयी त्यांनी दिल खुलास संवाद साधला.

सामाजिक चळवळीमुळेच हुंडाबळी, आदिवासी, मुलं असे विविध प्रश्न समोर आले. तेच प्रश्न माझ्या लेखनाचे उर्मी व उर्जा ठरले. विधवा, एड्सग्रस्त बायकांच्या पुनर्वसनासाठी व काय येईल या विषयांचा अभ्यास केला त्या अनुषंगाने इथल्या सामाजिक स्तराचं प्रतिबिंब 'ब्र' व 'भिन्न' कादंबरीत शब्दरुपातून मांडण्याचा प्रयत्न केली. 'स्त्री' केंद्रस्थानी ठेवूनच इथल्या कौटुंबिक रचना व व्यवस्थेचा मी वेध घेतला आहे. समाजाची स्थिती अनुभवयाची असेल तर त्यासाठी आजुबाजुला असलेले प्रश्न तुम्ही स्विकारलेच पाहिजे तरच त्याचे उत्तरे मिळतील.

आदिवासी भागात काम करताना बरेच अनुभव आले.

एकीकडे आपण बदललो आहोत, विकसित झालो आहोत असे चित्र असताना दुसऱ्या टोकाचेही आयुष्य जगणारी माणसे आहेत हे लक्षात आहे. त्यातूनच लेखनांकडे वळाले. वास्तवाकडे आपण कसे बघतो हे महत्त्वाचे आहे. साहित्य क्षेत्रातही खूप अंधश्रद्धा आहेत. 'ब्र' कादंबरी प्रकाशित झाली त्यावेळी विविध दिवाळी अंकात कथा लिहिण्याची पत्रे आली. परंतु कादंबरी लिहिली म्हणजे कथा लिहिता येईलच असे नाही. विविध प्रश्नांवर काम करणाऱ्या ४०० संस्था राज्यात आहेत. या संस्थांना परदेशातून ३०० कोटींचा निधी मिळतो, मात्र सामाजिक क्षेत्रातही गैरव्यवहार होत असल्याने त्याचे वास्तव समाजासमोर आणणे क्रमप्राप्त वाटले. सामाजिक कार्यात भलेबुरे अनुभव आले, असेही महाजन यांनी सांगितले.

भिन्न पुस्तक लिखाणासाठी जेव्हा खेड्यापाड्यात फिरावे लागले, तेथील महिलांना शैक्षणिक कमतरतेमुळे व रोजगाराची संधी उपलब्ध नसल्याने दुष्कृत्य करणाऱ्या समाजातील काही विघातक घटकांना बळी पडून वारांगना म्हणून वावरावे लागते, हे जाणवले. शहरात आल्यानंतर त्याकडे केवळ अश्लीलतेच्या नजरेने बघताना शासन व समाज त्यांना काय देते हे बघणे महत्त्वाचे आहे. केवळ शासनाच्या 'एचआयव्ही टाळा' अथवा 'एड्स टाळा' या जाहिरातीमुळे काय होणार, कोट्यावधी रुपये खर्च करून जाहिरात करण्यापेक्षा उपेक्षित महिलांसाठी खर्च केला तर असंख्य कुटुंबे सुखी होतील, याचा विचार शासन कधी करणार, अशा प्रकारच्या पुस्तकांतील अनेक आठवणींना त्यांनी उजाळा दिला.

'माझे लेखन प्रवासातील अनुभव' या कार्यक्रमास वनाधिपती विनायकदादा पाटील, ॲड. विलास लोणारी, विश्वास ठाकूर, गुरुमित बग्गा, आ. डॉ. शोभा बच्छाव, आश्विनी बोरस्ते उपस्थित होते.

**'कष्टाची भाकर'**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र, नाशिक व लोकनेते दत्ताजी पाटील प्रतिष्ठान, लासलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'कष्टाची भाकर' हा उपक्रम ज्येष्ठ समाजसेवक मा. डॉ. बाबा आढाव यांच्या शुभहस्ते, नाशिक विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. विनायकदादा पाटील, यांच्या अध्यक्षतेखाली, कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर, लोकनेते दत्ताजी पाटील प्रतिष्ठानचे नानासाहेब पाटील, निफाडचे तहसिलदार प्रकाश पाटील, बाबुराव पाटील, मविप्र सभापती नितीन ठाकरे, लोकनेते दत्ताजी पाटील बँकेचे अध्यक्ष संजय पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार, दि. ३० जानेवारी २००८ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव येथे संपन्न झाला.

महात्मा गांधी स्मृतीदिनी व हुतात्मा दिनाच्या औचित्यावर कमी दरात सकस अन्न उपलब्ध व्हावे या उद्देशाने हा उपक्रम सुरू झाला आहे. या उपक्रमाअंतर्गत भाकरी तीन रुपये, पोळी अडीच रुपये, भाजी तीन रुपये व पीठले दोन रुपये या दराने शनिवार सोडून दररोज सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत, हा उपक्रम लासलगाव येथे सुरू राहणार आहे.

पोटाची भुक भागविण्यासाठी भीक मागण्याऐवजी अल्पदरात मिळालेली कष्टाची भाकर अमुल्य ठरते त्यामुळे लोकांनी एक सामाजिक उपक्रम म्हणून या उपक्रमास साथ द्यावी. कष्टकऱ्यांना माफक दरात अन्न देणारा हा उपक्रम पवित्र आहे म्हणूनच यशस्वी होईल अशा शुभेच्छा डॉ. बाबा आढाव यांनी याप्रसंगी दिल्या.

# विभागीय केंद्र लातूर

## कार्यवृत्त

**दि. १६ नोव्हें. २००७** - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, लातूर यांच्यावतीने राष्ट्रीय सेवाग्राम (चलबुर्गा) येथे ग्रामीण महिला सक्षमीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे प्रमुख उद्‌घाटक व पाहुणे म्हणून डॉ. बाबा आढाव हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्र लातूरचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. तर मार्गदर्शक म्हणून प्रा. चंद्रकला भार्गव. अध्यक्षा, आदर्श महिला गृहउदयोग, लातूर, प्रा. ललिता गादगे, सौ. आशा भिसे तसेच प्राचार्य ढोबळे, डॉ. एन. ए. मोटे, हरीभाऊ जवळगे यांचीही विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव हरीभाऊ जवळगे यांनी केले. त्यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमाची माहिती दिली व ग्रामीण महिला सक्षमीकरण शिबिरामागची भूमिका स्पष्ट केली. या शिबिरात राष्ट्रीय सेवा ग्रामसह परिसरातील २० गावातील महिलांनी सहभाग नोंदविला. या शिबिराचे सूत्रसंचालन प्रा. दत्तात्रेय सुरवसे यांनी केले व शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शने सुर्यकांत सुरवसे यांनी केले आणि कार्यक्रमाची सांगता वाढविली.

**दि. २५ नोव्हें. २००७** - विभागीय केंद्र लातूरच्या वतीने दि. २५ नोव्हें. रोजी मा. यशवंतरात चव्हाण यांच्या २३ व्या स्मृतीदिनानिमित्त "यशवतंराव चव्हाण यांचा वाङ्‌मयीन दृष्टीकोन" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच स्त्री भृण हत्या या विषयावरील विभागीय स्तरावरील निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजनही करण्यात आले व्याखानाचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले हे उपस्थित होते. या कार्यक्रमास लेखक, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळेस सत्याग्रह संकल्पनेच्या शताब्दी वर्षानिमित्त प्रा. डॉ. नागोराव कुंभार यांनी लिहिलेल्या सत्याग्रह महात्मा गांधींचा दृष्टीकोन या वैचारिक पुस्तिकेचे प्रकाशनही या वेळेस कुलगुरुंच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ. गोपाळराव पाटील, डॉ. जनार्दन वाघमारे, ॲड. चंद्रशेखर बाचपायी व हरीभाऊ जवळगे इ. मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामकुमार रायवाडीकर व आभार प्रदर्शन प्रा. एस. एस. भांडवलकर यांनी केले.

**दि. ३१ जाने. २००८ - युवा जागरण शिबिर :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र लातूर आणि राष्ट्रीय सेवा योजना, पीपल्य कॉलेज, नांदेड यांच्या वतीने पीपल्स कॉलेज, नांदेड येथे ३१ जाने. २००८ रोजी युवा जागरण शिबिराचे आयोजन करण्यात आले.महाविद्यालयीन तरुण तरुणींना विषमता, जातीयता, धर्मांधता, दहशतवाद यांच्या विरोधात जागृत करुन त्यांना संघटित करुन योग्य दिशेने मार्गदर्शन करणे. जागतिकीकरण आणि त्यातून निर्माण झालेली नविन आव्हाने या प्रक्रियेत तरुणांनी संपूर्ण तयारीने, योजनापुर्वक व सावधतेने उतरल्यास यातून देशासाठी अनेक संधी निर्माण होतील. याच भूमिकेतून महाविद्यालयात शिकत असलेल्या तरुण तरुणींना एकत्रित आणून त्यांच्यात विचारांचे आदान प्रदान घडविणे आणि तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या विविध प्रश्नांवर प्रबोधन करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून हे शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण २४५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. लातून विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या कल्पनेतून या शिबिराची संकल्पना साकार झाली. विभागीय सचिव श्री. हरीभाऊ जवळगे, खजिनदार श्री. भाऊसाहेब गोरे, प्रा. उत्तमराव सुर्यवंशी, प्रा. डॉ. सुरेश सावंत इ. मोलाचे सहकार्य लाभले.

************************************

# Yashwantrao Chavan Pratishthan's Academy of Information Technology

(October 2007- February 2008)

**General**

1. The YCP's Academy of Information Technology continued its IT training programme during the year 2007-2008 and achieved good results.
2. The entire AIT moved to the basement of the building during Jan-Feb. 2007 due to renovation work on the fourth floor and construction of fifth floor. The AIT is continuing batches in basement. Diploma in Advanced Computing (DAC)
3. The DAC August 2007 Course was concluded on 04th February 2007. A farewell was organized for the students. 1st Three YCP Cash Prizes were awarded to following students.

| Prize | Name of Students |
|---|---|
| 1st YCP Cash Prize of Rs. 2000/- | Mr. Vaibhav Mankar |
| 2nd YCP Cash Prize of Rs. 1500/- | Ms. Rashmi Dalvi |
| 3rd YCP Cash Prize of Rs. 1000/- | Mr. Dhairaj Darade |

4. DAC course is a 6 Months fulltime course. Students will be admitted to the course on the basis of Common Entrance Test (CET). Free Common Entrance Test (CET) Training was provided on 17th & 18th Novembar 2007. Students attended the same training. CETs were conducted on 27th October 2007 & 24th November 2007. 28 students had attended the CET from YCP's AIT.
5. Technical abilities and HR Interview (stage II & III) are part of their admission procedure YCP's AIT organized Training for DAC stage II & III i.e. selection processes for February 2008 batch, on 05th & 06th January 2008, 29 candidates attended the same.
6. Stage II and III admission process for DAC February 2008 was conducted from 7th January 2008 to 12th January 2008 and on 19th January 2008. 104 students are admitted for DAC February 2008 Batch. The Batch commenced on 11th February 2008 and will be concluded on 2 August, 2008.
7. Centralized Common Placements Programme for DAC August 2007 batch, started on 02 Feb. 2008.

**Diploma in Information Technology (DIT)**

8. Diploma In Information Technology is Three months part-time Course. This course helps candidates to get introduction Computers as well as it helps to understand Office Automation Tools.
9. Four DIT Batches were conducted and 51 no. of students were trained since February 2008.
10. One DIT batch started on 22nd October and concluded on 15th January 2008. All students of this batch successfully completed the course.
11. DIT batch that was started on 14th November 2007 will go on till 16th February 2008.
12. DIT Fleet batch for Indian Navy was stared on 14th January 2008 will go on till 25th April 2008. 22

students are admitted for the same.

13. Another DIT batch was started on 07th February 2008 and will go on till 07th May 2008.
14. There Were "New Summer Vacation Batches" For DIT started in the month of March and April 2008.

**Diploma in Multimedia Creations (DMC)**

15. Diploma In Multimedia Creation is Four Months part-time course.
16. Two batches of DMC have conducted since February 2007
17. DMC batch had started on 2nd October 2007 & will be continuing till 22nd February 2008. Timing for this batch is 8.00 a.m. to 10.00 a.m.
18. DMC batch had started on 21st November & will be continuing till 19th March 2008. Timing for this batch is 2.00 p.m. to 4.00 p.m.
19. A new DMC batch will be starting from March 2008 & timing for this batch will be 8.a.m. to 10 a.m.

**Diploma in Advanced Computer Arts (DACA)**

20. DACA Course is 6 months Course. Students will be admitted to the course on the basis of Common Entrance Test (CET). For DACA February 2008 batch, CETs were conducted On 15 October 2007 and 12th November 2007. Selection Process of the same was held on 15th January 2008.
21. DACA August 07 batch is running smoothly. It will conclude by 16th February 2008.
22. DACA August 07 batch students attended International Animation Day on 28th October 2007.
23. DACA August 07 batch students attended study tour at 'Rhythm & Hues' on 09th January 2008.
24. 2D Animation movies were shown to students from 26th Jan 08 onwards to improve their creative abilities.

**Certificate course in programming using C (CCPC)**

25. A Special Course, " Certificate Course in Programming using 'C' (CCPC)". It was Launched by YCP's AIT for students who are interested to improve their knowledge of C language.
26. One batch of CCPC was held between 17th September 2007 to 12th November 2007.

**Corporate Training**

27. Corporate Training for Linux & Operating System was conducted for Employee State Insurance Corporation (E.S.I.C). 200 employees were trained.
28. Certificate Course in Information Technology, 94 hrs. course was conducted for Door Step School between 01st August 07 to 31st December 2007, 16 senior employees were trained.
29. Computer Awareness Programmer (CAP) ware conducted for DGNP. There were 38 employees trained. It was conducted between 12th November 2007 & 11th January 2008. Timings for this batch were from 9.30 a.m. to 5.30 p.m.
30. Computer Awareness Programmer (CAP) were conducted for Chief Engineering & Services Department for Naval Dockyard. It was conducted between 1st January 2008 to 25th January 2008. Timings for this batch were from 11.00 a.m. to 1.00 p.m.
31. Certificate Course in Computer Operations were conducted for DGQA, Vikhroli. It was conducted between 24th December 07 to 18th January 2008. We trained 120 employees.

**Army & Navy Batches**

32. We are conducting a Certificate Course In Information Technology for Western Naval Command, Which Started on 21st January 2008 and will be continuing till 11th April 2008.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मान्यवर

| अ. क्र | नाव | सन |
|---|---|---|
| १. | मा.प्रा. मधु दंडवते | १९९५ |
| २. | मा. श्री. बियांत सिंग-मरणोत्तर | १९९६ |
| ३. | मा. डॉ. सी. सुब्रमण्यम् | १९९७ |
| ४. | मा. श्रीमती इला भट | १९९८ |
| ५. | मा. श्रीमती आवाबाई वाडिया | १९९९ |
| ६. | मा. श्री. सुंदरलाल बहुगुणा | २००० |
| ७. | मा. डॉ. व्ही. करियन | २००१ |
| ८. | मा. डॉ. जयंत नारळीकर | २००२ |
| ९. | मा. श्री. आर. के. लक्ष्मण | २००३ |
| १०. | मा. न्या. व्ही. आर. कृष्णा अय्यर | २००४ |
| ११. | मा. सॅम पित्रोदा | २००५ |
| १२. | मा. श्री. नारायण मूर्ति व सौ. सुधा मूर्ति | २००६ |



## यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार २००७

### श्रीमती वैशाली शिंदे

# सन्मानपत्र

कऱ्हाड तालुक्यातील बेलवडे बुदुक या खेडेगावात आपला जन्म झाला. पोटासाठी भाजी-भाकरी आणि हाताला कष्ट अशा शेतकरी कुटुंबात आपले बालपण गेले. कासेगाव शिक्षण संस्थेत शालेय शिक्षण आपण घेतले. आपले किशोरवय सर्वसामान्य मुला-मुलींप्रमाणेच शाळा, घर, मैत्रिणींच्या समवेत बागडण्यात गेले. बहुजन समाजातील एखादया सर्वसामान्य मुलीच्या वाट्याला येणारे रितीरिवाज, परंपरा आणि चालीरितींचे उंबरठे सांभाळत आपण वाढलात.

आपल्या सामाजिक कार्याची पायाउभारणी ज्या सुखांतिकेमुळे झाली, तीच सुखांतिका अखेर शोकांतिका ठरली. आपला विवाह कराडमधील ज्या व्यक्तीबरोबर झाला ती व्यक्ती विवाहापूर्वीच एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह होती, मात्र ती बाब लपवून ठेवून आपल्याशी विवाहबध्द् झाली. विवाह या आनंददायी घटनेच्या मुळाशी स्त्रवणाऱ्या विषाणूंनी आपल्याला एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह ही पदवी आपसूकच बहाल केली. लौकिक शिक्षण इयत्ता बारावी पर्यंतचे, मात्र समाजात वावरताना पॉझिटिव्ह हाच शिक्का आपल्या कपाळावर उमटला... संसाराला सुरुंग लागला... सगळी स्वप्ने विस्कटून गेली...

एड्सग्रस्त पतीचा श्वास थांबला, जन्माला आलेला शुभम बाळही आपल्या डोळ्यादेखत मृत्यूच्या स्वाधीन झाला... उरली केवळ 'पॉझिटिव्ह' ची राख... या राखेतून चालताना आपला श्वास जड झाला, हातापायातले त्राण गेले, मनातले चैतन्य हरवल्यासारखी स्थिती झाली. या स्थितीत जगण्याचा नवा अध्याय सुरु करायचा? पण कसा? समाज, 'पॉझिटिव्ह' चा शिक्का घेऊन जगणे शक्य आहे? अशा विचारांनी आपण पुरते घेरुन गेलात... आता एकमेव सोबत होती, ती म्हणजे एच.आय.व्ही. 'पॉझिटिव्ह' ची.

एका क्षणी मात्र मनाने उभारी घेतली आणि मान वर करुन आपण समाजाला स्पष्टपणे सांगितलं, 'होय, मी एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह आहे. हाच रोग माझा जिवलग मित्र आहे. साताजन्माच्या जोडीदाराने दिलेली ही दुर्दैवाची भेट आहे...' वैशाली शिंदे ही सामाजिक विचारांची मशाल या घटनेमुळे प्रज्वलीत झाली. आपले समाजकार्याचे ध्येय निश्चित झाले. डोक्यावरचा पदर खांदयावर घेऊन चंग बांधला आणि एड्सविषयक प्रबोधनाचा मार्ग आपण ठरवला.

मुलींना शिवणकाम, युवक-युवतींना एड्सविषयक मार्गदर्शन, व्यसनाधीनता विरोधी जागरण आणि महिलांना स्वावलंबनाचे धडे देण्यास आपण सुरुवात केली. ओघवती वक्तृत्वशैली, त्यातून पाझरणारी तळमळीची ज्योत तळागाळापर्यंत पोहोचविणे, हा आपल्या जगण्याचा भाग बनली. व्याख्याने, मेळावे, कार्यशाळा आणि सर्वस्तरीय थेट संपर्काने माणसाला जागे करण्याचा वसा आपण हाती घेतला. **'मी फसले तुम्ही फसू नका'** या पुस्तकाचे लेखन, आकाशवाणी, दूरदर्शनवरील आपल्या मुलाखतीतून समाज सुधारण्याचा मार्ग आपण दाखवत राहिलात. आई-वडील, सासू सासरे, बहिण-भावंडे, शेजारी-पाजारी ही नाती आता खूप मागे राहिली. 'मी समाजासाठी जगणार आणि श्वास थांबेल तेव्हा हा देह टाकून देणार' हे जळजळीत सत्य बेधडकपणे सांगण्याचे धारिष्ट्य आपण केले. महाराष्ट्रभर भ्रमंती करुन प्रबोधनाची बीजे पेरण्याची आपली जिदद्, कणखरपणा वाखाणण्यासारखा आहे. या कार्यासाठी आपणाला यापूर्वी लाभलेले विविध प्रेरणा पुरस्कार आपल्या कर्तृत्वाचे साक्षीदार आहेत.

आपल्या कार्यकतृत्वाची नोंद घेऊन, या कार्याला पाठबळ मिळावे, यासाठी आपणास आज **यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार २००७** प्रदान करुन आपला सन्मान करताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानास विशेष अभिमान वाटत आहे.

नागपूर
दिनांक : १२ जानेवारी २००८

**दत्ता बाळसराफ**
संयोजक
नवमहाराष्ट्र युवा अभियान

**शरद पवार**
अध्यक्ष
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई



# यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार - २००७

## मा. श्री हेरंब कुलकर्णी

## सन्मान पत्र

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले गावात एका सामान्य कुटुंबात आपला जन्म झाला. 'इंग्रजी साहित्य' या विषयातून आपण एम्. ए. अभ्यासक्रम पूर्ण केला. शिक्षक व्हायचे स्वप्न बाळगून त्यासाठी आपण बी. एड. अभ्यासक्रम पूर्ण केला. सध्या आपण शिक्षक म्हणून अहमदनगर जिल्ह्यात काम करत आहात. शिक्षक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता अशा विविध भूमिकेतून शिक्षण सुधारण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व वाढत आहे. पण आपल्याकडील प्राथमिक शिक्षणाची दयनीय अवस्था झाली आहे. शिक्षणामधील विविध दोषांवर आपण बोट ठेवले. राज्य व देश पातळीवरील अनेक चर्चासत्रे, परिसंवाद व संमेलनामध्ये सहभागी होऊन आदिवासी व ग्रामीण भागातील शिक्षणाची दशा आपण चव्हाट्यावर मांडली. सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत अशा विविध वृत्तपत्रातून शिक्षणाच्या वैकल्याच्या स्थितीवर आपण विपुल लेखन केले. शहरातील मुलांप्रमाणेच खेड्यापाड्यातील मुलांनाही दर्जेदार शिक्षण मिळावे याचा तुम्ही सतत आग्रह धरला. आदिवासी मुलांच्या शिक्षणाचा अभ्यास करण्यासाठी आपण नंदुरबार, गडचिरोली, चंद्रपुर, मेळघाट, नांदेड येथील आदिवासी भागांत सलग तीन महिने फिरला. दोनशे शाळांना भेटी दिल्या. इयत्ता चौथी, इयत्ता सातवीतील विद्यार्थी धडाधडे वाचू - लिहू शकत नाहीत, गणन करू शकत नाहीत हे तुम्ही वर्गा - वर्गातून पाहिले. ही बिकट स्थिती बदलण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांची असलेली अनास्था, शाळांमध्ये अर्धपोटाने मुले शिकत असले तरी त्याची पर्वा न करता भ्रष्टाचारात गुंतलेले शिक्षण अधिकारी, याचे चित्र आपण पुराव्यासह समोर आणले. 'शाळा आहे - शिक्षण नाही' हे पुस्तक लिहले. विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी ही शिक्षकाची आहे, पण शिक्षकच घडलेले नसतील तर विद्यार्थी कसे घडतील. ७७-८० टक्के गुण मिळवून डीएड बीएड अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या या भावी शिक्षकांच्या लिखाणात शुद्धलेखनाच्या असंख्य चुका, गणित सोडविता येत नाही, इंग्रजीचे ज्ञान तर खूपच दूर, देशाचे राष्ट्रपती - पंतप्रधान कोण याची माहिती नाही. शाळा महाविद्यालयीन पुस्तकांव्यतिरिक्त पुस्तकांचे वाचन नाही आणि वृत्तपत्र वाचनाचीही आवड नाही. विद्यार्थ्यांमधील हे अज्ञान सर्वे मधून आपण समोर आणले.

शिक्षणातील केवळ दोष मांडण्याचेच आपण काम केले नाही, तर त्या दोषांवर उपाय शोधण्याचेही काम केले. कामचुकार शिक्षकांवर वृत्तपत्रातून आसूड ओढताना प्रामाणिक शिक्षकांचेही कौतुक केले. सरकारच्या अनास्थेबद्दल टीका करताना 'गुणवत्ता विकास कार्यक्रमासारख्या' उपक्रमाबद्दल जाहीर समर्थनही केले.

आपले कार्य इथपर्यंतच थांबत नाही. महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यात फिरून आपण सेतूशाळांना भेटी दिल्या व त्याचा अहवाल 'सर्व शिक्षा अभियानकडे' सादर केला. आपण अहमदनगर जिल्ह्यातील ५० शाळांना भेटी दिल्या व इंग्रजी विषयाच्या शिक्षण पद्धतीची पाहणी करून त्याचाही सविस्तर अहवाल लिहला. प्रतिष्ठित अशा 'साधना' साप्ताहिकासाठी 'वंचित घटकांचे व मुलींचे शिक्षण' या विशेषांकाचे आपण अतिथी संपादक म्हणून काम केले. युनिसेफने या अंकाच्या तब्बल ७० हजार प्रती विविध शाळांमध्ये वितरित केल्या. आपण मांडलेल्या मतांची राज्य सरकार, विविध सामाजिक संस्था आणि शिक्षण तज्ज्ञ यांनी नेहमीच दखल घेतली आहे. पगारवाढ व्हावी म्हणून शिक्षक संघटना सरकारवर टीका करतात, आंदोलने करतात. पण आपण मिळालेली पगारवाढ नाकारण्याचे औदार्य दाखविले. सक्तीने मिळालेल्या वेतनवाढीतून जवळपास एक लाख रुपयांची विविध सामाजिक संस्थांना आपण मदतही केली आहे.

राज्यात सध्या कार्यरत असलेल्या साडे आठ हजार वस्तीशाळांचे नियमित शाळांत रूपांतर करण्याचा महाराष्ट्र सरकारने निर्णय घेतला. त्या अनुषंगाने सरकारने नेमलेल्या अभ्यास गटात तुमचा समावेश करण्यात आला. दुर्गम भागातील वस्तीशाळांकडे साधनांची कमतरता आहे; पण त्यावरही मात करून या शाळांतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अपार कष्ट घेतल्याचे आपण निदर्शनास आणून दिले.

शिक्षणाची दिशा बदलत असताना दीनदुबळ्यांच्या शिक्षणाची हेळसांड होऊ नये, यासाठी आपण नेहमी दक्ष राहिलात. समाजामध्ये आपल्यासारखे अनेक कार्यकर्ते निर्माण होण्याची गरज आहे.

आपल्या या कर्तृत्वाची उचित नोंद घेऊन या कार्यास पाठबळ मिळावे यासाठी आपणास आज 'यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार - २००७' प्रदान करण्यात येत आहे. आपला सन्मान करताना आम्हाला आज अत्यंत आनंद होत आहे.

नागपूर
१२ जानेवारी २००८

दत्ता बाळसराफ
संयोजक
नवमहाराष्ट्र युवा अभियान

शरद पवार
अध्यक्ष
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# *Yashwantrao Chavan Pratishthan's Academy Of Information Technology*

सीडैक CDAC अॅक्टस acts

## *"Take Full Advantage of the IT Boom"*

*Start Your Drive Now To Cover The Miles Of IT*

## Admission Open For Part-Time And Weekend Batches

### *Certificate Course In Information Technology (CCIT)*

- Computer Fundamentals
- Configuring and Using a PC
- Office Automation Tools (MS Word, MS Excel, MS Power point)
- Communication Using PC (Internet)
- Common Utilities (Scanning, Printing, Win Zip, CDROM, Floppy Disk etc.)

### *Diploma In Multimedia Creation (DMC)*

- Graphic Visualization
- Intergration of Text & Graphics
- Slide Presentation
- Digital Multimedia
- HTML Scripting & Web Animation

**Note** : -(Software : MS Word, MS Power Point, Adobe Illustrator, Photoshop, Indesign, Premiere, Micromedia Director, Dreamweaver, Flash, Sound Forge, HTML)

### *Diploma In Information Technology (DIT)*

- Computer Fundamentals
- Configuring and Using a PC
- Office Automation Tools
- (MS Word, MS Excel, MS Power point)
- Database Concept using MS Access
- Communication Using PC (Internet)
- Common Utilities(Scanning, Printing, Win Zip, CDROM, Floppy Disk etc.)

### *Certificate Course In Programming Using "C" (CCPC)*

- Programming in C
- Data Structure in C
- Introduction to OOPs
- Visual Basic
- Mock CET
- General Aptitude

### *Corporate Training*

- Basic Training
- Refresher Training
- Updating / Upgrading
- Latest Technologies
- Customised Curriculum

*Consistent Best Performance Award From "C-DAC" Pune*

**For Further Information Contact :**
**Y.B. Chavan Centre, Authorized Training Center Of "C-DAC".**

## प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने :

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधी मंडळातील निवडक मराठी भाषणे भाग १<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २००.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधीमंडळ भाग २<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय. बी. चव्हाण खंड १ ते ४<br>संपादन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | ३.५० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६. | म. ज्योतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ०८ | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन - अण्णासाहेब शिंदे | ६०.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टीकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन - दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन - पी. बी. पाटील | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास - संशोधक / लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन. राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाऊंटीफूल बनियन - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र खंड ४ (इंग्रजी)<br>- बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक - ना. धो. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई' बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |

## • व्हिडिओ कॅसेटस् •

- ★ मी. एस.एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- ★ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- ★ प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- ★ पुल वृत्तांत : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट

  या चारही व्हिडीओ कॅसेटस्ची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने केली असून दिग्दर्शनाची जबाबदारी सुप्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.
- ★ कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शन - श्री. राम गबाले
- ★ येस् आय एम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट
  दिग्दर्शन - विनय नेवाळकर

# ◉ क्षणचित्रे



टकमक टोकावरुन रॅपलिंग करताना १० वर्षांचा कुमार निखिल टेंगळे - नवमहाराष्ट्र युवा अभियान



नागपूर 'वि. रा. हंबर्डे यांची नाटके' जन्मशताब्दीनिमित्त आयोजित परिसंवाद डावीकडून सहभागी मान्यवर डॉ. धनश्री बोरीकर, डॉ. हरिश्चंद्र बोरकर, डॉ. मदन धनकर, प्रा. राजन जयस्वाल, अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य राम शेवाळकर, डॉ. संध्या अमृते, डॉ. विजय हंबर्डे व देवेंद्र बोंद्रे



मा. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवर मा. श्री. उदयदादा लाड, मा. नानासाहेब शेवाळकर, श्री. दत्ता मेघे, श्री. गिरीश गांधी (नागपूर)




दि. २७ जानेवारी २००८ रोजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली येथे महिलांसाठी आयोजित केलेली विधी कार्यशाळेत आपले मांडताना मा. अॅड. एम. बी. पवार व इतर उपस्थित मान्यवर

# ◉ क्षणचित्रे




दि. १६ डिसेंबर २००८ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पिरकोन, ता. उरण, जि. रायगड येथे झालेली विधी साक्षरता कार्यशाळा उपस्थित मा. एम. बी. पवार, मा. ॲड. प्रमोद ढोकळे इ.




'उत्तुंग भरारी' कार्यक्रमात उद्योजिका, डावीकडून सुचेता मुंडे, अनिता संझगिरी, शिवानी नाईक, मृदुला साठये यांच्याशी सवांद साधताना महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या संयोजक श्रीमती रेखा नार्वेकर



किशोरवयीन मुलींसाठी आयोजित केलेल्या 'जाणीव जागृती' शिबिरासाठी श्री. नारायणराव आचार्य विद्या निकेतन, माहुल रोड - चेंबूरच्या - विद्यार्थीनी



यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी कार्यक्रम - औरंगाबाद, मा. सुहास तेंडुलकर, निलेश राऊत, सुधीर सेवेकर व इतर मान्यवर

# क्षणचित्रे

सी-डॅक - डॅक (फेब्रुवारी ०८) ची बॅच





सी-डॅक - टॉप तीन रँक होल्डर (ऑगस्ट ०७) बॅच
प्रथम - वैभव मानकर
द्वितीय - रश्मी दळवी
तृतीय - धिरज

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या 'सृजन' उपक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी





यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या परीवारातील प्रा. शुभानंद जोग (सर ज. जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई) सल्लागार सृजन यांना ४८व्या महाराष्ट्रराज्य कला प्रदर्शनात पारितोषिक लाभल्याबद्दल अभिनंदन !

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद.

नवमहाराष्ट्र युवा अभियान

आयोजित

# मराठवाड्याच्या इतिहासातील सर्वात भव्य शैक्षणिक प्रदर्शन...





सहभाग - पंधरा हजारावर विद्यार्थी व पालक, राज्यातील ४० नामवंत शैक्षणिक संस्था.

व्हिजन करिअर व्याख्यानमाला - राज्यातील दहा नामवंत वक्त्यांचा समावेश.

दि. २८, २९, ३० मे २००७ औरंगाबाद.

# VISION Career Fair